मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३०५ ■ शनिवार, १८ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# देशातील 75 आणि महाराष्ट्रातील दोन अमृत रेल्वे स्थानकांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण

## बारामती रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती मिळेल – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**बारामती :** अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत देशातील ७५ अत्याधुनिक अमृत रेल्वे स्थानकांचे तसेच महाराष्ट्रातील बारामती आणि नांदुरा या दोन पुनर्विकसित रेल्वे स्थानकांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. यावेळी बारामती रेल्वे स्थानक येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मनोगत व्यक्त करताना बारामती रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास हा केवळ स्थानकाचा कायापालट नसून बारामतीसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि कृषी विकासाला नवी गती देणारा टप्पा असल्याचे सांगितले.

यावेळी पुणे रेल्वे विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा, बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, रेल्वे विभागाचे अधिकारी-कर्मचारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेचा आधुनिकतेकडे वेगाने प्रवास सुरू असून जागतिक दर्जाच्या सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षित आणि प्रवासीस्नेही सेवा यामुळे भारतीय रेल्वे नव्या भारताच्या विकासाचे प्रतीक बनली आहे. अमृत भारत स्टेशन योजना, वंदे भारतसारखे उपक्रम हे त्या परिवर्तनाचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले.

बारामती रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, विकासाची जाणीव आणि सर्जनशीलता वाढावी या उद्देशाने निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.





"विकसित रेल्वे स्थानकाचा भारत" आणि "विकसित भारत घडवण्यासाठी मी काय करेन" या विषयांवर झालेल्या स्पर्धांमध्ये एम.ई.एस. गजाननराव भीमराव देशपांडे विद्यालय, निर्मला हरिभाऊ प्राथमिक शाळा तसेच इतर शाळांतील एकूण २ हजार ८५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वच्छ, आधुनिक, पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक रेल्वे स्थानकाची संकल्पना मांडत विकसित भारतासाठी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शिस्त, शिक्षण, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच विजेत्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

देशातील आतापर्यंत २६१ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास पूर्ण झाला असून आज आणखी ७५ स्थानके राष्ट्राला समर्पित होत आहेत, ही देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले.

महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांना मोठी गती मिळाली असून बारामती रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास त्याचाच एक महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. उद्योग, शिक्षण, कृषी आणि सहकार क्षेत्रातील बारामतीची ओळख अधिक बळकट करण्यासाठी हे आधुनिक स्थानक उपयुक्त ठरेल. औद्योगिक क्षेत्राला वाहतूक सुविधा, कृषी उत्पादनांना बाजारपेठ, तसेच शिक्षणासाठी येणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सुमारे साडे २६ कोटी रुपये खर्चून बारामती रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास करण्यात आला असून त्यासाठी राज्य शासन आणि रेल्वे मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. स्थानकाच्या इमारतीमध्ये आधुनिक सुविधांसह स्थानिक संस्कृतीचे प्रतिबिंब दिसेल अशी वास्तुरचना करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा, आधुनिक प्रतीक्षागृह, स्वच्छ प्रसाधनगृहे, सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था, पर्यावरणपूरक सौरऊर्जा प्रणाली तसेच स्थानिक हस्तकला आणि उत्पादनांच्या विक्रीसाठी विशेष दालनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामुळे 'व्होकल फॉर लोकल' संकल्पनेलाही चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

बारामतीच्या सर्वांगीण विकासासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान स्मरणात ठेवून विकासाचा हा वारसा पुढे नेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# पनवेल शहर अभियंता पदी राजेश कर्डिले यांची नियुक्ती

## डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनतर्फे सत्कार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेच्या शहर अभियंता पदावर राजेश कर्डिले यांची नियुक्ती झाल्याबद्दल डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनच्या वतीने त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.





डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचलित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा, नवीन पनवेल ही संस्था संस्थापक डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षांपासून बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या शिक्षण, पुनर्वसन व सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत आहे. या शाळेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याचा आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला जात आहे.राजेश कर्डिले यांची या विशेष शाळेशी भावनिक नाळ जुळलेली असून, विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी वेळोवेळी मोलाचे सहकार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची दखल घेत शाळेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी शाळेचे संस्थापक डॉ. नंदकुमार मारुती जाधव तसेच खजिनदार अतुल वाणी यांनी राजेश कर्डिले यांचे अभिनंदन करत नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. शहराच्या विकासाबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांचे योगदान भविष्यात अधिक प्रभावी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.सत्कार समारंभ प्रसंगी उपस्थितांनी राजेश कर्डिले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जयंत पाटील व महेबूब शेख यांनी आमदार सुरेश धस यांच्या वर आरोप करण्यापूर्वी आत्मपरीक्षण करावे, अँड.जब्बार पठाण यांचा पलटवार

**दैनिक युवक आधार**
**शेख महेशर ताहेर, पाटोदा (प्रतिनिधी)** - आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या विरोधात जयंत पाटील व महेबूब शेख यांनी केलेले आरोप हे पूर्णपणे निराधार, बिनबुडांचे व राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा ॲड.जब्बार पठाण यांनी प्रसिद्धीपत्रकाद्धारे केला आहे. प्रसिद्धीपत्रकात ॲड.जब्बार पठाण यांनी म्हटले आहे की, सर्वसामान्यांच्या न्यायासाठी सातत्यांने संघर्ष करणारे आमदार सुरेश आण्णा धस यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी काही जणांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार केला जात आहे. मात्र अशा खोट्या आरोपांमुळे जनतेच्या मनातील त्यांचे स्थान कमी होणार नाही. पुढे ते म्हणाले की, दुसऱ्यांवर आरोप करण्यापूर्वी जयंत पाटील व महेबूब शेख यांनी स्वतःच्या राजकीय वाटचालीचे आत्मपरीक्षण करावे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर बोलण्याऐवजी केवळ प्रसिद्धीसाठी बिनबुडांचे आरोप करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी या वेळी केला. आमदार सुरेश आण्णा धस यांनी आपल्या राजकीय कारकीदीत जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरुन संघर्ष केला असून, त्यांच्या विरोधात सुरू असलेली बदनामीची मोहिम यशस्वी



> 'आमदार सुरेश आण्णा धस हे सर्वसामान्यांचे खरे नेतृत्व आहे. अशा व्यक्तीवर चिखलफेक करणे हे राजकीय नीचपणाचे लक्षण आहे. जनता सर्व पाहत आहे आणि योग्य वेळी जनता योग्य ते उत्तर देईल...
>
> ॲड.जब्बार पठाण

होणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. खोट्या आरोपांना आमदार सुरेश आण्णा आण्णा धस यांचे समर्थक लोकशाही मार्गाने, कायद्याच्या चौकटीत राहून ठामपणे उत्तर देतील. तसेच आमदार धस यांच्या वरील अपप्रचार कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा इशाराही ॲड.जब्बार पठाण यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.

## भारतात लवकरच प्लास्टिकच्या नोटा?

**वृत्तसंस्था :** भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) देशात प्लास्टिकच्या (पॉलिमर) चलनी नोटा आणण्याच्या दिशेने पाऊल टाकत असून, यासाठी पथदर्शी (पायलट) प्रकल्प राबविण्याची तयारी सुरू आहे. पारंपारिक कागदी नोटांऐवजी अधिक टिकाऊ, सुरक्षित आणि स्वच्छ प्लास्टिक नोटांचा वापर करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. RBI च्या नियोजनानुसार, सुरुवातीच्या टप्प्यात ₹१० च्या प्लास्टिक नोटा प्रायोगिक तत्त्वावर जारी करण्यात येतील. या नोटांची चाचणी कोची, म्हैसूर, जयपूर, शिमला आणि भुवनेश्वर या पाच शहरांमध्ये केली जाणार आहे. विविध हवामानात या नोटांची टिकाऊपणा आणि कार्यक्षमता तपासण्यासाठी या शहरांची निवड करण्यात आली आहे. प्लास्टिक नोटांचे आयुष्य कागदी नोटांच्या तुलनेत सुमारे पाचपट अधिक असून त्या पाणी, घाम आणि इतर द्रवांमुळे सहज खराब होत नाहीत.




# पनवेल शहर वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्तास तात्काळ उपचार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोली सर्कलकडे जाणाऱ्या खांदेश्वर पुलासमोरील शंकर मंदिराजवळ एका दुचाकी चालकाने पायी चालत असलेल्या व्यक्तीस धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात राकेश कुमार यांच्या उजव्या पायाच्या गुडघा व घोटा यामधील भागाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले.

यावेळी पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस शिपाई क्र. 4697 महेंद्र गळवे हे ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाईदरम्यान सरकारी वाहनाने पनवेल वाहतूक शाखेकडे जात असताना सदर



घटना त्यांच्या निदर्शनास आली.

त्यांनी क्षणाचाही विलंब न करता प्रसंगावधान राखून नागरिकांच्या मदतीने जखमी पादचारी तसेच दुचाकी चालक या दोघांनाही स्वतः चालवत असलेल्या सरकारी वाहनातून तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. वेळेवर मिळालेल्या या मदतीमुळे जखमीस त्वरित वैद्यकीय उपचार मिळू शकले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार हे वाहतूक नियमनासोबतच मानवतावादी कर्तव्यही तत्परतेने पार पाडत असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. त्यांच्या या तत्पर आणि संवेदनशील कार्याचे उपस्थित नागरिकांनी मनापासून कौतुक केले.

# अलिबाग सां.बा.चा भोंगळ कारभार?

## खानाव जवळील रस्ता तयार होतोय 15 दिवसात तयार होतोय

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी :** अलिबाग तालुक्यातील नेहमी वरदळीच्या असणाऱ्या अलिबाग रोहा रस्त्यावरील पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसामुळे खानाव जवळील पुलाला मोठाखड्डा पडल्यामुळे अलिबाग मधून रोह्याला जाणाऱ्या प्रवाशांना 8 किलोमीटरची करून वावे फाट्यावर यावे लागते यामुळे प्रवासी खाजगी वाहने यांना मानसिक त्रास व डिझेल पेट्रोलचा खर्च वाढल्याने अलिबाग सार्वजनिक बांधकाम खात्याच्या या ढिसाळ कारभारामुळे प्रवासी वर्गात संतापाची लाट उसळलेली आहे. या परिसरात गेल कंपनी असून येथील कर्मचारी अधिकारी, कंत्राटदार आणि शेतकरी यांना 8 किलोमीटरचा वळसा घालून जावे लागते, मोटरसायकल स्वरांना मात्र खानाव गावातील अंतर्गत रस्त्यावरून जाता येते, चार चाकी नाही कारण ग्रामस्थ व लहान मुले यांच्या सुरक्षेसाठी रेवदंडा पोलीस ठाण्याचे कर्मचारी व होमगार्ड पथक प्रवासी व नागरिकांच्या सेवेसाठी ठेवले आहेत मात्र सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी व




कर्मचारी या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा परिसरात आहे, यासाठी जिल्हा आपत्ती प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी रायगड श्री. किसन जावळे यांनीही या आपत्तीकडे लक्ष घालावे अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

# युवासेनेचा जनहिताच्या विविध प्रश्नांवर आक्रमक पाठपुरावा..
# आयुक्त मंगेशजी चितळे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध ज्वलंत प्रश्नांवर युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा लोकसभा संपर्कप्रमुख मा. श्री. विश्वजीतजी बारणे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेचे सन्माननीय आयुक्त मा. श्री. मंगेशजी चितळे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतील मोबाईल विक्री वाहनधारकांचा प्रश्न, रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी व अतिक्रमणे तसेच पनवेलमध्ये शासकीय व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र उभारण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत (CMEGP) व्यवसाय करणाऱ्या ३७ पेक्षा अधिक मोबाईल विक्री वाहनधारक कुटुंबांच्या रोजगाराचा प्रश्न अत्यंत गांभीर्याने मांडण्यात आला. शासनाच्या अधिकृत योजनेतून उद्योग सुरू केलेल्या लाभार्थ्यांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना महापालिकेमार्फत अधिकृत व्यवसायासाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अंतिम निर्णय होईपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये तसेच या प्रश्नावर कायमस्वरूपी धोरण तयार करण्यात यावे, अशी ठाम मागणी युवासेनेने केली.

त्यानंतर पनवेल, खांदेश्वर, मानसरोवर आणि खारघर रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी,



अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे आणि प्रवाशांच्या गैरसोयीचा विषय उपस्थित करण्यात आला. स्थानक परिसरात वाढणारी वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्किंग आणि अतिक्रमणामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून देत, अनधिकृत पार्किंगवर कठोर कारवाई, अधिकृत पार्किंगची उभारणी, अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम, दिशादर्शक फलक, सीसीटीव्ही यंत्रणा आणि महानगरपालिका, वाहतूक पोलीस व रेल्वे प्रशासन यांच्या समन्वयातून कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली.

याच बैठकीत पनवेल शहरात वाढत्या अमली पदार्थांच्या व्यसनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र तातडीने सुरू करण्याच्या मागणीचाही जोरदार पाठपुरावा करण्यात आला. यापूर्वी सादर केलेल्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल जाहीर करावा, व्यसनमुक्ती केंद्रासाठी योग्य जागा निश्चित करून राज्य शासनाकडे तात्काळ प्रस्ताव पाठवावा, संबंधित विभागांची संयुक्त बैठक आयोजित करावी तसेच संपूर्ण प्रक्रियेचे कालबद्ध नियोजन जाहीर करावे, अशी मागणी युवासेनेने केली.

युवासेनेने बैठकीत स्पष्ट भूमिका मांडली की, रोजगाराचे संरक्षण, नागरिकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा आणि व्यसनमुक्त समाजाची निर्मिती ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. या विषयांमध्ये कोणताही विलंब न करता तातडीने ठोस निर्णय घेणे आवश्यक असून, अन्यथा सर्वसामान्य नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास कमी होईल.

आयुक्त मा. श्री. मंगेशजी चितळे यांनी सर्व विषय गांभीर्याने ऐकून घेत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. संबंधित विभागांशी समन्वय साधून या सर्व विषयांवर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल तसेच योग्य तोडगा काढण्यासाठी प्रशासनाला सूचना करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी नगरसेवक तथा महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, युवासेना लोकसभा अध्यक्ष पराग मोहिते, जिल्हा अध्यक्ष रोशन पुजारी, जिल्हा सचिव रोहन ढोले, जिल्हा समन्वयक प्रतिक ढोंगरे, विधानसभा संपर्क प्रमुख ॲड अभिनय सोमण, विधानसभा अध्यक्ष जय कुष्टे, विधानसभा संघटक ओंकार वेदांते, सोशल मिडिया तालुका प्रमुख सृजन जोशी, शहर अध्यक्ष जयेश विसावे, ॲड. तुषार चौधरी, वृषभ गोंधळी, शहर सचिव विनीत पाटील, यश म्हात्रे, शहर समन्वयक दुर्गेश शुक्ला, भावेश घावट, शहर उपाध्यक्ष आदिल शेख, विभाग अध्यक्ष अक्षय पवार, आयुष ओंबळे, विभाग उपाध्यक्ष फरहाद शेख, सोशल मीडिया खांदा कॉलनी अध्यक्ष साई मोप्सुगू, सूर्यांश तिवारी आदी उपस्थित होते.

शेवटी युवासेनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, पनवेलकरांच्या रोजगार, सुरक्षितता, आरोग्य आणि मूलभूत नागरी सुविधांशी संबंधित प्रत्येक प्रश्नावर युवासेना यापुढेही ठामपणे आवाज उठवत राहील आणि जनहितासाठी सातत्याने पाठपुरावा करीत राहील.

## पावसातही नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत पोलिसांना न्यूईरा हॉस्पिटलकडून १५० रेनकोटचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** समाजाच्या सुरक्षेसाठी ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता आपले कर्तव्य चोखपणे बजावणाऱ्या पोलिसांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी न्यूईरा हॉस्पिटल, वाशी यांच्या वतीने वाशीतील पोलिसांना १५० रेनकोटचे वाटप करण्यात आले. मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला नवी मुंबईचे सह- पोलीस आयुक्त श्री. दीपक साकोरे, वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत चांदेकर आणि न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माताप्रसाद गुप्ता उपस्थित होते.* दररोज वाहतूक नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांना मुसळधार पावसातही दीर्घकाळ रस्त्यावर उभे राहून काम करावे लागते. अशा परिस्थितीत त्यांना आवश्यक संरक्षण मिळावे आणि त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने न्यूईरा हॉस्पिटलने हा उपक्रम हाती घेतला.

यावेळी हॉस्पिटलच्या प्रतिनिधींनी पोलिसांच्या समर्पित सेवेला सलाम करत



त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेबरोबरच समाजहिताचे उपक्रम राबविण्यास न्यूईरा हॉस्पिटल सदैव कटिबद्ध असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

न्यूईरा हॉस्पिटल्सचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माताप्रसाद गुप्ता म्हणाले,* आपल्या सुरक्षिततेसाठी पोलीस कर्मचारी कोणत्याही हवामानात न थकता आपले कर्तव्य बजावतात. त्यांच्या या समर्पित सेवेला सलाम करण्यासाठी आणि मान्सूनमध्ये त्यांचे आरोग्य व सुरक्षितता जपण्यासाठी आम्ही १५० रेनकोटचे वितरण केले. समाजाच्या प्रत्येक घटकाच्या आरोग्य आणि कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्यासाछी न्यूईरा हॉस्पिटल नेहमीच प्रयत्नशील असते.

## वाढवणविरोधात राजकीय विरोधकांचे छुपे राजकारण

**दैनिक युवक आधार**

**पालघर/प्रतिनिधी** : राज्यातील महायुती सरकारचा अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेला ७२ हजार कोटी रुपयांचा वाढवण बंदर आणि एक्स्प्रेस-वे लिंक प्रकल्प रोखण्यासाठी महाविकास आघाडीने (एमव्हीए) स्थानिक आदिवासी आणि मच्छीमार समाजाच्या भावनांचा राजकीय वापर सुरू केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. संपूर्ण कोकणपट्टीत असंतोष निर्माण करून आगामी २०२९च्या निवडणुकांसाठी स्वतःची राजकीय पोळी भाजण्याची रणनीती विरोधकांनी आखल्याचा दावा राजकीय निरीक्षकांनी आणि ग्राऊंड रिपोर्टर्सनी केला आहे.

वास्तविक पाहता, वाढवण बंदर प्रकल्पाचे काम अतिशय सुनियोजित आराखड्याप्रमाणे सुरू असून, प्रशासनाने, तसेच 'वाढवण बंदर पोर्ट प्रकल्प कंपनी'ने स्थानिक लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक पावले उचलली आहेत.

स्थानिक युवा वर्ग या नवीन संधींसाठी तयार व्हावा, म्हणून 'आयटीआय' मध्ये विशेष व विविध कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. बंदर कार्यान्वित झाल्यानंतर थेट रोजगार मिळावेत या उद्देशाने तसे कोर्स बनवण्यात आले असून स्थानिक व होतकरू तरुणांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्यात येत आहे.यासाठी मुंबई विद्यापीठाशी रीतसर करार करण्यात आला असून, विद्यापीठाने पालघरमधील १२ महाविद्यालयांमध्ये बंदराशी संबंधित विशेष कोर्सेस सुरू करण्याचे नियोजन केले आहे.

**स्थानिक नागरिकांना सोबत**

घेऊन अतिशय पूरक वातावरणात हे विकासाचे काम पुढे सरकत असतानाच, महाविकास आघाडीचे घटक पक्ष यावर केवळ राजकारण करून विकासात अडथळे निर्माण करत असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, मविआचे नेते २०२५च्या उत्तरार्धापासूनच ग्रामसभांमध्ये छुप्या पद्धतीने सक्रिय आहेत. या प्रकल्पाच्या

**पालघरच्या विकासाला खीळ घालण्याचा डाव; स्थानिक आदिवासी आणि मच्छीमारांमध्ये असंतोष पसरवून निवडणुकीची रणनीती**

निमित्ताने भीती घालून भोळ्या भाबड्या आदिवासी जनतेत आणि मच्छीमार समाजात असंतोष निर्माण केला जात आहे. 'पेसा कायदा' आणि 'वन हक्क कायद्या'च्या तरतुदींचा आधार घेऊन ग्रामसभांच्या माध्यमातून भूसंपादनाला जाणीवपूर्वक विरोध केला जात आहे.

एका वरिष्ठ राजकीय विश्लेषकाने अचूक निरीक्षण नोंदवले आहे की, विरोधी पक्षासाठी पर्यावरणीय काळजी ही केवळ एक ढाल असून, आगामी निवडणुकीचे गणित हीच त्यांची खरी तलवार आहे.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दोन वर्षांत दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, वाढवण लिंक हा त्याचाच एक मुख्य भाग आहे.

या सर्व राजकीय गणितांच्या आणि अडथळयांच्या पलीकडे जाऊन, महायुती सरकार स्थानिक जनतेचा विश्वास संपादन करून विकासाची ही गंगा पालघरमध्ये आणण्यासाठी ठाम आहे.नवीन रस्ते, मुंबई-दिल्ली एक्सप्रेस हायवे, विमानतळ, औद्योगिक वसाहत आणि शिपिंग संबंधित प्रोजेक्ट्समुळे पालघर हे भविष्यातील चौथी मुंबई म्हणून उदयास येणार असून, येथील तरुणांचे भविष्य अधिक उज्ज्वल आणि आत्मनिर्भर होणार, यात जराही शंका नाही.

देशासाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा हा प्रकल्प स्थानिकांचे जीवनमान पूर्णपणे पालटवून टाकणारा आहे. बंदर हाताळणी क्षमतेच्या दृष्टिकोनातून या प्रकल्पाला खीळ बसणं किंवा उशीर होणं हे कोणाच्याही हिताचे नाही. दुर्दैवाने असे झाल्यास या बंदराच्या निमित्ताने निर्माण होणारे दहा लाखांहून अधिक रोजगारांपासून येथील स्थानिक तरुण वर्ग वंचित राहील.

## स्त्युत उपक्रम राबवून चि.सर्वम रजनीकांत बोरेले यांच्या खाऊच्या पैशातून गरजु विद्यार्थिनींना शिक्षण साहित्य संच वाटप

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : पांढरकवडा येथील चि.सर्वम रजनीकांत बोरेले यांचा वाढदिवस १६ जुलै २०२६ रोजी गरीब विद्यार्थी मुला - मुलींना शिक्षण साहित्याचा संपूर्ण संच वाटप करुन वाढदिवस साजरा करण्यात आला.सर्वम बोरेले हा प्रख्यात व्हिसल ब्लोअर,सामाजिक कार्यकर्ता आणि जिंदल पुरस्कार विजेता रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा मुलगा आहे.यावेळी इयता १ ते ७ च्या वर्गातील एकूण १५०विद्यार्थी व विद्यार्थ्यानी शिक्षण सहित्यांचे संच चि.सर्वम बोरेले यांचे हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थी,त्यांचे पालक, शिक्षक,शिक्षिका,बोरेले यांचे समर्थक,अश्या जवळ पास ३००, लोकांना फ्रेंच फ्राय,वेज मनच्युरन, नुडल्स,केक आणि आईस्क्रिम खाऊ घालुन ढोल -






ताशाच्या वाजंत्री मध्ये सर्वंम बोरेले यांनी तीन मोठे केक कापूण वाढदिवस साजरा केला आहे.सर्वम बोरेले यांचा वाढदिवस नगर परिषदच्या दीनदयाल उपाध्य मराठी शाळा क्र.2' आठवडी बाजार पांढरकवडा येथे साजरा करण्यात आले.महत्वाची बाब म्हणजे याच शाळेतील गरीब, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना मागील १८ वर्षा पासून शिक्षण साहित्य संच,स्कूल बैग, लंच बॉक्स आणि सावित्री बाई फुले शासकीय दत्तक योजने अंतर्गत गरीब विद्यार्थी यांचे शिक्षणाचा भार घेणे अश्या "दानशूर" कार्य व्हिसल ब्लोअर रजनीकांत बोरेले हे करीत आहे.या प्रसंगी सौ.नीताताई बोरेले (मडावी) यांनी उपस्थित विद्यार्थ्याना मोलाचे मार्गदर्शन केले तर रजनीकांत बोरेले यांनी शैक्षणिक,आध्यामिक,कॉमिडी आणि सामाजिक विषयावर केलेल्या मार्गदर्शनमुळे बरेच जन भावुक झाले होते.यावेळी शिक्षिका राधिका कोंडा पलकुलवार यांनी कार्यक्रमाची प्रस्ताविक आणि रजनीकांत बोरेले यांनी अनेक वर्षा पासून विद्यार्थिनींना दिल्या मद्दत कार्यावर प्रकाश टाकले यावेळी मुख्याध्यापक दिनेश सातुरवार यांनी सुद्धा बोरेले यांच्या कार्याची प्रशंसा करुन शुभेच्छा देत आभार मानले.

## शालेय विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे; नवीन पनवेल वाहतूक शाखेचे जनजागृती अभियान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पोलीस उपायुक्त (वाहतूक) डॉ. राहुल खाडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या पोलीस शाळा दत्तक योजना' व पोलीस बाल सुरक्षा अभियान' अंतर्गत सेंट विल्फ्रेड हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, शेंडून टोलनाका येथे विद्यार्थ्यांसाठी वाहतूक नियमांविषयी जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमात वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार संजय गावडे, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर वाघ आणि पोलीस हवालदार जितेंद्र कदम यांनी विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांचे महत्त्व अत्यंत सोप्या व प्रभावी पद्धतीने समजावून सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे



सिग्नल व नियमांचे काटेकोर पालन करणे, दुचाकी वाहन चालविताना दर्जेदार हेल्मेटचा वापर करणे, चारचाकी वाहन चालविताना सीट बेल्ट लावणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, विरुद्ध दिशेने वाहन न चालविणे, तसेच स्वतःची व इतरांची सुरक्षितता जपणे याबाबत सविस्तर प्रबोधन करण्यात आले. वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, असा संदेशही विद्यार्थ्यांना देण्यात आला.

या कार्यक्रमास पोलीस नाईक प्रदीप जाधव व पोलीस शिपाई राकेश बर्डे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमात सुमारे ३०० ते ३५० विद्यार्थी-विद्यार्थिनी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका स्वाती येवले यांनी नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी केलेल्या उपक्रमाचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. सकाळच्या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक शिस्त, रस्ते सुरक्षा आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव अधिक दृढ झाल्याचे समाधान उपस्थितांनी व्यक्त केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरला.

## आरोपीला पोलिसांनी केली अटक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** हत्या प्रकरणातून पळून गेलेल्या आरोपीला तळोजा पोलिसांनी गुजरात, वलसाड येथून 16 जुलै रोजी अटक केली. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.चंदन कपिलकुमार पांडे याची हत्या करून आरोपी रमेश कुमार स्वामीनाथ यादव हा फरार झाला होता. हत्या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी पथके तयार केली. आरोपीला गुजरात, वलसाड येथून पोलिसांनी अटक केली.

## सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ पाटोद्यात चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक संपन्न २० जुलै रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शनांचा निर्णय

**दैनिक युवक आधार**

**शेख महेशर ताहेर, पाटोदा (प्रतिनिधी)** : देशातील प्रख्यात वैज्ञानिक व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक हे 'नीट' परीक्षेतील कथित गैरव्यवहार तसेच परीक्षा पद्धतीतील अनियमिततेची जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या १९ दिवसांपासून उपोषण करत आहेत. उपोषणामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक होत असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या समर्थनार्थ शुक्रवार, दिनांक १७ जुलै रोजी पाटोदा येथे चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सोमवार दिनांक २० जुलै रोजी पाटोदा उपविभागीय कार्यालयासमोर निदर्शने करण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला. तसेच राम मंदिर देणगी अपहार प्रकरणात दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणीही या निदर्शनांदरम्यान करण्यात



येणार असल्याचे ठरविण्यात आले. नीट परीक्षेच्या प्रक्रियेत पारदर्शकता, विद्यार्थ्यांना न्याय आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास कायम राखण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने योग्य पावले उचलावीत, अशी मागणी बैठकीतील उपस्थितांनी केली. तसेच सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीची गंभीर दखल घेऊन त्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी आणि त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, असे मतही व्यक्त करण्यात आले. या बैठकीस कॉ.महादेव नागरगोजे, भाई विष्णुपंत घोलप, शिवभूषण जाधव, राहुल जाधव, गणेश कवडे, मुकुंद शिंदे, आकाश कांकरिया, शेख इलियास, सय्यद रियाज, पत्रकार जावेद शेख, पत्रकार हमीदखान पठाण यांच्या सह विविध चळवळीतील , सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगड जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड जिल्हा वैश्य युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६ चे आयोजन रविवार 26 जुलै रोजी ज्येष्ठ नागरिक संघ हॉल ठाणे नाका, पनवेल येथे सकाळी 11 वाजता करण्यात आले आहे. मनोज महादेव आंग्रे मा. अध्यक्ष रायगड जिल्हा वैश्य युवक संघ, माजी रायगड जिल्हा शिक्षण समिती पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे. रायगड जिल्ह्यातील वैश्यवाणी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करण्यासाठी जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६ आयोजित करण्यात आला आहे. इयत्ता 10 वी – किमान 60% गुण, इयत्ता 12 वी / डिप्लोमा – किमान 60% गुण (डिप्लोमा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना 12 वी समकक्ष मानले जाईल), पदवीच्या अंतिम वर्षात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी यांनी 19 जुलैपर्यंत सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत आपली नावे पाठवून या गुणगौरव सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत क्रीडा सह्याद्री, निफाड व बालभारती पब्लिक स्कूल, दिंडोरीचे वर्चस्व

## १७ वर्षांखालील अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन, नाशिक यांच्या मान्यतेने तसेच टेनिस क्रिकेट असोसिएशन, दिंडोरी यांच्या आयोजनाखाली जिल्हास्तरीय १७ वर्षांखालील टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा उमराणा रोड येथील पोलीस भरती प्रशिक्षण मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील ११ संघांनी सहभाग नोंदवत दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेतील चुरशीच्या सामन्यांमुळे उपस्थित प्रेक्षकांना थरारक लढतींचा आनंद अनुभवता आला.

मुलांच्या गटात क्रीडा सह्याद्री, निफाड संघाने सुरुवातीपासूनच दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत के. के. वाघ युनिव्हर्सल स्कूल, निफाड संघाचा पराभव करून जिल्हा अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामन्यात संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, अचूक फलंदाजी आणि शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. या गटात के. के. वाघ युनिव्हर्सल स्कूल, निफाड संघ उपविजेता ठरला, तर के. के. वाघ इंग्लिश स्कूल, डीजीपी नगर, नाशिक संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

मुलींच्या गटात बालभारती पब्लिक स्कूल, दिंडोरी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. धनलक्ष्मी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय संघाने द्वितीय क्रमांक मिळविला, तर के. के. वाघ इंग्लिश स्कूल, डीजीपी नगर, नाशिक आणि सरस्वती विद्यालय, वणी यांनी संयुक्त तृतीय क्रमांकावर समाधान मानले.

स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल बालभारती पब्लिक स्कूल, दिंडोरी आणि होरिझन इंग्लिश मीडियम स्कूल, नांदगाव यांना उत्कृष्ट संघ म्हणून विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला.



भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ. मीनाक्षी गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उद्घाटन समारंभास नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड, दिंडोरी टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष संदीप बोरसे, क्रीडाशिक्षक प्रशांत आढाव, संकेत चंद्रमोरे, पृथ्वीराज वडगुळे, अनिकेत भवर, अक्षय चौधरी, सिद्धांत चंद्रमोरे, मुकेश सोनवणे, कीर्तिराज सर, राहुल तांबे, दीपक जाधव, वनिता शेळके मॅडम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सचिव विलास गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाचे नियम, तांत्रिक बाबी, पंचगिरीचे महत्त्व तसेच राष्ट्रीय स्तरावरील संधी याविषयी मार्गदर्शन केले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व खेळाडूंना त्यांनी शुभेच्छा देत सातत्याने सराव करण्याचे आवाहन केले.

स्पर्धेत निफाड, दिंडोरी, नांदगाव, नाशिक ग्रामीण, कळवण, वणी, सटाणा आणि पेठ या तालुक्यांतील संघांनी सहभाग घेतला.

उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि खेळाडूंच्या उत्साहामुळे संपूर्ण स्पर्धेला विशेष रंगत आली.

स्पर्धेतील विजेत्या संघांचे आणि खेळाडूंचे भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर, महासचिव सौ. मीनाक्षी गिरी, उपाध्यक्ष विलास गिरी, महिला अध्यक्षा धनश्री गिरी, महाराष्ट्र सदस्य दर्शन थोरात, सहसचिव धनंजय लोखंडे तसेच नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव व विभागीय अध्यक्ष विलास गायकवाड यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी साई देशमुख, सार्थक गायकवाड, अभिनव लोखंडे, यश खांदवे, अथर्व वडजे आणि प्रथमेश देशमुख या स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले. पंच, प्रशिक्षक, स्वयंसेवक, आयोजक आणि सहभागी संघांच्या सहकार्यामुळे स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडू नाशिक जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर निश्चितच उज्ज्वल करतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# काँग्रेसच्या रायगड जिल्हा महिला आघाडीतर्फे अर्जुन पाटील यांना श्रद्धांजली

## पत्रकार कृष्णा पाटील परिवाराच्या सांत्वनासाठी पंचक्रोशीतील मान्यवरांची रिघ

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : उलवे नोडमधील मोरावे गावचे ज्येष्ठ नागरिक आणि वारकरी सांप्रदायाचा वारसा चालवणारे आणि भजन-कीर्तनात आयुष्य जगलेले अर्जुन भोकाजी पाटील यांचे ९ जुलै रोजी निधन झाले. ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील यांचे ते वडील होत. त्यामुळे दिवंगत अर्जुन पाटील यांना सर्व क्षेत्रांतील मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली आहे. काँग्रेसच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा रेखा घरत, उरण तालुका महिला अध्यक्षा निर्मलाताई पाटील, रायगड जिल्हा महिला चिटणीस सोनाली पाटील, शांता म्हात्रे, सरचिटणीस सविता ठाकूर, तुलसा पंडित, पार्वती पाटील, जयश्री पाटील आदी महिला कार्यकर्त्यांनी दिवंगत अर्जुन पाटील यांना शुक्रवारी (ता. १७) श्रद्धांजली वाहिली. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, युवा अध्यक्ष निखिल ढवळे, किरीट पाटील, वैभव पाटील, लंकेश ठाकूर, उत्तम कोळी, नाना गडकरी आदी मान्यवरही उपस्थित होते. त्यांनीही दिवंगत अर्जुन पाटील यांना श्रद्धांजली वाहिली.



दरम्यान, यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल गव्हाणच्या सर्व शिक्षिका, तसेच माजी केंद्रप्रमुख रंजना पाटील, सुहासिनी भगत, वनिता पाटील, मो. का. मढवी गुरुजी, डी. आर. पाटील, मिनल माळी, 'सकाळ' वृत्तपत्र समूहाचे आजी-माजी कर्मचारी वृंद, तसेच पंचक्रोशीतील सर्वच क्षेत्रांतील मान्यवरांचीही पत्रकार कृष्णा पाटील परिवाराच्या सांत्वनासाठी रिघ लागली आहे. अर्जुन पाटील स्मृतिप्रीत्यर्थ दररोज गरुड पुराणाचे वाचन दत्ता म्हात्रे करीत आहेत, तर परिसरातील विविध भजन मंडळेही आपल्या सुमधुर आवाजात आदरांजली वाहात आहेत. प्रसिद्ध भजन गायक निवृत्तीबुवा चौधरी यांचे भजन शनिवारी (ता. १८) होणार आहे. दिवंगत अर्जुन पाटील यांचे उत्तरकार्य मंगळवारी, २१ जुलै रोजी अर्जुन भवन, मोरावे येथे होणार आहे. त्यानिमित्त महेश महाराज साळुंखे यांचे कीर्तन १० ते १२ या वेळेत होणार आहे.

# जनजागृती सेवा संस्थेच्या विशेष उपक्रमाअंतर्गत बाल संगोपन केंद्रातील मुलींना खाऊ व जीवनावश्यक वस्तू प्रदान

**दैनिक युवक आधार**

**डोंबिवली(प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर)**: गोड,निरागस, खोडकर , खेळकर चिमुकल्या बालिकांसाठी आज वेळात वेळ काढून "ओमकार साई बालसंगोपन" केंद्रातील बालिकांना खाऊ तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या मुलभूत जीवनावश्यक वस्तू भेट म्हणून देण्यात आल्यात...

यावेळेस बालसंगोपन केंद्रातील मुलींच्या आनंदाला पर्वणीच मिळाली!!

"प्रत्येक मूल एक निरागस रोपटे असते. त्याला योग्य संस्कारांचे खतपाणी दिले तरच त्याचा उत्तम वृक्ष बनतो."खरंच बालिका संगोपन म्हणजे केवळ मुलींचे पालनपोषण करणे नव्हे, तर त्यांना उत्तम संस्कार आणि प्रेम देणे होय.मुलींच्या संगोपनात आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यात या केंद्राने किती मोलाचे योगदान दिले हे या बालिकांच्या कलात्मक गुणातून दिसते,

"संगोपन संस्थेतील प्रत्येक मूल म्हणजे मातीचा एक असा गोळा आहे, ज्याला प्रेमाने घडवल्यास एक सुंदर मूर्ती तयार होऊ शकते."

या मुलांना घर जरी नसलं, तरी स्वप्नं मोठी आहेत. आपले सगेसोयरे कोणीही नसले, तरी पंखात उडण्याची जिद्द आहे."

या मुलांसोबत घालवलेले आजचे हे प्रेमळ क्षण!!

हे त्यांच्यातही एक सुंदर, निष्पाप आणि प्रेमळ जग दडलेले आहे हे दाखवून देते......



यावेळेस ओमकार साई बालसंगोपन केंद्राच्या अध्यक्षा सुविधा दांडेकर, जनजागृती संस्थेतर्फे संस्थेचे सदस्य पुनम कदम,(सामाजिक कार्यकर्त्या- डोंबिवली शहर) शोभा राणे, वर्षा मोहिते,सायली पांडव, निता नेवरेकर या उपस्थित होत्या.

जनजागृती सेवा संस्था बालसंगोपन केंद्रातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आनंदासाठी दरवर्षी विशेष वेगवेगळे उपक्रम राबवत असते त्यातील हा एक उपक्रम ज्यातून मुलांना प्रेमाची व आपलेपणाची अनुभूती मिळते....कारण अश्या प्रकारच्या उपक्रमातून त्यांच्यात नक्कीच आनंदाचे वातावरण निर्माण होते...


## पाहिजेत

**भामेश्वर शिक्षण संस्था पाटोदा, संचलित भामेश्वर विद्यालय पाटोदा.**

**कनिष्ठ लिपिक - पात्रता - पदवीधर व MS-CIT कॉम्प्युटर**

**१ पद - ओपन**

**वरील प्रमाणे पद भरावयाचे असुन तरी पात्र उमेदवारांनी अर्ज करावेत.**

**मुलाखत दिनांक - २८/०७/२०२६**

**वेळ :- सकाळी - १०:०० ते दुपारी ०१:०० वाजे पर्यंत**

**अर्ज साठी पत्ता:- अध्यक्ष भामेश्वर शिक्षण संस्था, पाटोदा. स्टेट बँकेच्या पाठीमागे (घुमरे बी.एस.) दुसरा मजला, रूम नंबर ०३ पाटोदा, ता.पाटोदा जि.बीड.**


### जाहीर प्रगटन

पाटील प्रभतराव शिवराम, रा. बावलगाव, ता. चाकूर, जि. लातूर हे लातूर ते उदगीर महामंडळाच्या बसने प्रवास करीत असताना त्यांचे बी. फार्मसीचे मूळ पदवी प्रमाणपत्र (Original Degree Certificate) तसेच इतर महत्त्वाची कागदपत्रे हरवली आहेत.

सदर मूळ पदवी प्रमाणपत्र हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (SRTMUN) यांचे आहे.

सदर कागदपत्रे कोणाला सापडल्यास कृपया खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

मोबाईल : 7588549868

### जाहीर नोटीस

नमुना एन डी

(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH06AZ1893 चे मालक कै.राजेश लक्ष्मण सावंत याचं दिनांक 18/05/2014 रोजी निधन झाले आहे.

मी

आसावरी राजेश सावंत.

साई साधना, B/002,सेक्टर -10,खांदा कॉलनी, न्यू पनवेल रायगड, महाराष्ट्र, -410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**आसावरी राजेश सावंत.**
**साई साधना, B/002,सेक्टर -10,खांदा कॉलनी, न्यू पनवेल रायगड,महाराष्ट्र,410206.**

### जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील ॲड. संतोष मारुती सापते

श्रीवर्धन येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

अर्ज क्रमांक :-/ २०२६

१) रवी सखाराम जाधव
वय :-२२ वर्षे, व्यवसाय :- मोलमजुरी
२) प्रफुल्ल बबन वाघमारे
वय :- ३७ वर्षे, व्यवसायः - मोलमजुरी
३) राजेश रवींद्र वाघमारे
वय :- ४६ वर्षे, व्यवसायः- मोलमजुरी
४) धनश्री संतोष निवंडेकर
वय :- ०८ वर्षे, व्यवसाय :- शिक्षण
५) मनस्वी संतोष निवंडेकर
वय :- ०९ वर्षे, व्यवसाय :- शिक्षण ................**अर्जदार**
६) अनिता किसन वाघमारे
वय :- ३१ वर्षे, व्यवसाय :- गृहिणी
७) भारती मंगेश वाघमारे
वय :- २४ वर्षे, व्यवसाय :- गृहिणी
८) किरण लहू पवार
वय :- २७ वर्षे, व्यवसाय :- मोलमजुरी
९) पूजा रुपेश पवार
वय :- २४ वर्षे, व्यवसाय :- गृहिणी
१०) हर्षला राजेश वाघमारे
वय :- २० वर्षे, व्यवसायः गृहिणी
११) मंगला शांताराम जाधव
वय :- ४५ वर्षे, व्यवसाय :- गृहिणी
सर्व रा.मु. पो. आदिवासी वाडी वावेतर्फे
श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड

**विरुद्ध**

१) मा. ग्रामविकास अधिकारी तथा जन्म
मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रामपंचायत वावे तर्फे श्रीवर्धन ..........**सामनेवाला**
ता श्रीवर्धन जि रायगड
२) गटविकास अधिकारी पंचायत
समिती श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड

सर्व जनतेस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे सर्व मु. पो. वावे तर्फे श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील कायमस्वरूपी चे रहिवासी आहेत. अर्जदार

-१/-यांचा जन्म अनुक्रमे १) रवी सखाराम जाधव जन्म दि. ०१-०१-२००४, २) प्रफुल्ल बबन वाघमारे जन्म दि. १-०१-१९८९, ३) राजेश रवींद्र वाघमारे जन्म २७-११-१९८०, ४) धनश्री संतोष निवंडेकर जन्म १४-०४-२०१८, ५) मनस्वी संतोष निवंडेकर जन्म १९-०६-२०१७, ६) अनिता किसन वाघमारे जन्म ६-११-१९९५, ७) भारती मंगेश वाघमारे जन्म १-०१-२००२, ८) किरण लहू पवार जन्म दि.०१-०१-१९९९, ९) पूजा रुपेश पवार जन्म दि.०१-०१-२००२, १०) हर्षला राजेश वाघमारे जन्म दि :- ०४-०५-२००६ व मंगला शांताराम जाधव जन्म दि ०१-०१-१९८१ रोजी मु.पो. वावेतर्फे श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांच्या जन्माच्या नोंदीबाबत दाखला मिळण्याकरिता व तशा प्रकारची निर्देश यातील सामनेवाले यांस मा. न्यायालयामार्फत देण्याकरता मा. न्यायालय जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये नोंद करून मिळण्याकरिता मा न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदरचा जन्माचा दाखला हा अर्जदार यास शासकीय कामासाठी व इतर खाजगी कामे करण्याकामी हवा आहे. सबब या नोटिसेने कळविण्यात येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरकत व असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसा 2/3 हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सर्व अर्जदार यांचा रोजी मु.पो. वावे तर्फे श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे झाला आहे. याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून तसे मा. न्यायालय संबंधित सामनेवाला यांस निर्देश देतील व इतर कोणाचीही तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्थळ :- श्रीवर्धन** **सही /-**
**दिनांक:- १७ /०७/२०२६**
**मा. कार्यकारी दंडाधिकारी**
**श्रीवर्धन ता श्रीवर्धन**
**जि. रायगड**

# पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वपूर्ण आढावा बैठक; पाणी, उड्डाणपूल आणि पुनर्वसन प्रकल्पांना गती

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत शिलार धरण, न्हावा-शेवा पाणीपुरवठा योजना, देहरंग धरण, रेल्वे उड्डाणपूल आणि प्रधानमंत्री आवास योजनेतील पुनर्वसनावर सविस्तर चर्चा

**पनवेल (प्रतिनिधी) :** वेगाने विस्तारत असलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्वाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा, उड्डाणपूल, रेल्वे फाटकांवरील वाहतूक कोंडी तसेच रखडलेल्या विकास प्रकल्पांना गती देण्यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन विविध प्रकल्पांचा आढावा घेत आवश्यक निर्देश देण्यात आले.

वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत मूलभूत सुविधांवर येणारा प्रचंड ताण. विशेषतः पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, रखडलेले पायाभूत सुविधा प्रकल्प, वाहतूक कोंडी आणि भविष्यातील विकासासाठी आवश्यक नियोजन या विषयांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पनवेल महानगरपालिका मुख्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. बैठकीस महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये,सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, प्रवीण पाटील, सुमित झुंजारराव, अजय बहिरा, शत्रुघ्न काकडे, यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

**शिलार धरण प्रकल्पासाठी निधी उभारणीवर भर!**

पनवेलच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्यासाठी महत्वाचा मानला जाणारा शिलार धरण प्रकल्पही बैठकीचा केंद्रबिंदू ठरला. या धरणातून ७५ टक्के पाणी पनवेल महानगरपालिकेला दिले जाणार आहे. त्यानुसार मनपाकडून खर्च सुद्धा केला जाणार आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक निधी कशा पद्धतीने उपलब्ध करून देता येईल, शासनाच्या विविध योजनांमधून आर्थिक तरतूद कशी मिळवता येईल आणि प्रकल्पाला प्रशासकीय



गती कशी देता येईल यावर सखोल चर्चा झाली. पाणी ही केवळ आजची गरज नसून भविष्यातील पिबंबांसाठीही आवश्यक असलेली जीवनावश्यक बाब असल्याने शिलार धरण प्रकल्पाला प्राधान्य देण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली.

**न्हावा-शेवा पाणीपुरवठा योजना टप्पा-३ वर सविस्तर चर्चा!**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दरवर्षी हजारो नवीन नागरिक वास्तव्यास येत आहेत नवीन गृहनिर्माण संकुले, औद्योगिक प्रकल्प, शैक्षणिक संस्था आणि व्यापारी संकुलांमुळे पाण्याची मागणी झापाट्याने वाढत आहे. विद्यमान जलस्रोतांवर वाढणारा ताण लक्षात घेता न्हावा शेवा योजना टप्पा-३ हा प्रकल्प भविष्यातील पाणीपुरवल्याचा करणा ठरणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.या प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील प्रलंबित टप्पे, तांत्रिक अडचणी, कामांच्या गतीचा बारकाईने आढावा घेण्यात आला प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यासाठी आवश्यक समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले.

**देहरंग धरणाच्या क्षमतेत वाढ करण्याची चाचपणी!**

बैठकीत देहरंग धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव महत्त्वाने चर्चिला गेला, यासंदर्भात सर्वसाधारण सभेमध्ये सुद्धा चर्चा झाली. पुढील सभेमध्ये सुद्धा हा विषय सभागृहासमोर मांडला जाणार आहे. धरणाची साठवण क्षमता वाढल्यास पनवेल महानगरपालिका क्षेत्राला अधिक प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी तांत्रिक, पर्यावरणीय आणि प्रशासकीय बाबींचा अभ्यास करून पुढील कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारे पाणी साठवून त्याचा वर्षभर नियोजनबद्ध वापर करण्यासाठी हा पर्याय उपयुक्त ठरू शकतो, असे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले.

**आमदार प्रशांत ठाकूर यांचा स्पष्ट संदेश !**

बैठकीदरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, पनवेल महानगरपालिका क्षेत्राचा विस्तार गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व वेगाने झाला आहे. नव्या गृहनिर्माण योजना, औद्योगिक क्षेत्रांचा विस्तार, शिक्षण, आरोग्य आणि बाहतूक क्षेत्रातील मोठ्या गुंतवणुकीमुळे शहराची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. पनवेल हे भविष्यातील जागतिक दर्जाचे शहर म्हणून विकसित होत आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू, जेएनपीटी, मेट्रो, महामार्ग आणि इतर मोठ्या प्रकल्पांमुळे शहराची लोकसंख्या आणि नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे आज घेतलेले निर्णय पुढील अनेक दशकांतील पाणीपुरवठा आणि विकासाचा पाया ठरणार आहेत. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्नांमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब सहन केला जाणार नाही. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत आणि नागरिकांना दिलासा मिळेल याची काळजी घ्यावी, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या बैठकीत अधोरेखित केले.

**रेल्वे फाटकांवरील वाहतूक कोंडीवर उपाययोजना ! झोपडपट्टीवासीयांचे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पुनर्वसन**

पनवेल शहरातील वाढत्या वाहतुकीमुळे अनेक रेल्वे फाटकांवर दररोज मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होत आहे, नागरिकांचा वेळ, इंधन आणि आर्थिक नुकसान हराळण्यासाठी ज्या-ज्या ठिकाणी रेल्वे फाटक आहेत, तेथे महा रेलच्या माध्यमातून उड्डाणपूल उभारण्याच्या प्रस्तावाना गती देण्याचे निर्देश आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिले. तसेच पनवेल महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टीवासीयांचे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याच्या विषयावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील पात्र झोपडपट्टीधारकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळावा, त्यांना सुरक्षित व कायमस्वरूपी निवास उपलब्ध व्हावा आणि पुनर्वसनाची प्रक्रिया पारदर्शक, नियोजनबद्ध व गतिमान पद्धतीने राबविण्यात यावी, यावर बैठकीत भर देण्यात आला.

---

# रेवदंड्यात डॉ. नानासाहेब धर्माधिकारी स्वागत कमानींचे भूमिपूजन

## सेवा-संस्कारांच्या विचारांना मिळणार भव्य रूप'

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रेवदंडा परिसरात महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांचा, समाजसेवेच्या परंपरेचा आणि संस्कारमूल्यांचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविणाऱ्या भव्य स्वागत कमानींचे भूमिपूजन गुरुवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार आणि आमदार महेंद्र दळवी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर या स्वागत कमानींच्या उभारणीला शासनाची मंजुरी मिळाली आहे.



थेरोंडा पानसेवाडी, रेवदंडा मोठे बंदर आणि रेवदंडा बायपास या प्रमुख मार्गांवर उभारण्यात येणाऱ्या या कमानी रेवदंडा परिसराची नवी ओळख ठरणार असून, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी समाजात रुजविलेल्या सेवा, शिस्त, स्वच्छता, राष्ट्रभक्ती आणि मानवतेच्या विचारांचे प्रतीक म्हणून उभ्या राहणार आहेत. भूमिपूजन सोहळ्यास आमदार महेंद्र दळवी यांच्यासह कामगार नेते दिपक रानवडे, जिल्हा परिषद सदस्य अनंत गोंधळी, डॉ. सचिन राऊळ, मुरुड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, अलिबाग पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील, पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, उपजिल्हाप्रमुख शैलेश चव्हाण, रेवदंड्याचे सरपंच प्रफुल्ल मोरे, मांडलाचे सरपंच ऋतिक नागोठकर तसेच शिवसैनिक, पदाधिकारी, कार्यकर्ते, श्रीसदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रारंभी थेरोंडा फाटा येथे अलिबाग पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील यांच्या हस्ते विधिवत पूजाविधी पार पडला. त्यानंतर डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे भाऊ आठवले आणि श्रीसदस्यांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढविण्यात आले. आमदार महेंद्र दळवी यांनी कुदळ मारून स्वागत कमानीच्या बांधकामाचा शुभारंभ केला. त्यानंतर रेवदंडा मोठे बंदर पुलानजीक दुसऱ्या स्वागत कमानीचे भूमिपूजन मुरुड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार महेंद्र दळवी म्हणाले, "डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाने स्वागत कमानी उभारण्याची अनेक वर्षांची संकल्पना आज प्रत्यक्षात आकार घेत आहे. त्यांनी समाजाला दिलेला सेवा, संस्कार आणि राष्ट्रकार्यासाठी समर्पणाचा संदेश आजही लाखो लोकांना प्रेरणा देत आहे. या कमानींच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची ओळख आणि विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत राहील. या कमानींचे बांधकाम पुढील तीन महिन्यांत पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे."

**लाखो हातांना दिली समाजसेवेची दिशा**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी श्रीसमर्थ बैठक परंपरेच्या माध्यमातून समाजकारणाला लोकचळवळीचे स्वरूप दिले. स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जलसंवर्धन, रक्तदान, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, आपत्तीग्रस्तांना मदत, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता अशा असंख्य उपक्रमांतून लाखो श्रीसदस्यांना समाजहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

त्यांच्या मार्गदर्शनातून उभी राहिलेली सेवा परंपरा आजही देश-विदेशात विविध सामाजिक उपक्रमांद्वारे कार्यरत असून, समाजासाठी निःस्वार्थपणे काम करण्याचा संदेश देत आहे. त्यामुळे उभारल्या जाणाऱ्या या स्वागत कमानी केवळ प्रवेशद्वार नसून सेवा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरणार आहेत.रेवदंडा, चौल आणि परिसरात येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत आता या भव्य कमानींद्वारे होणार असून, परिसराच्या सौंदर्यात भर घालतानाच समाजहिताच्या कार्याची प्रेरणा देणारी नवी ओळखही निर्माण होणार आहे.

---

# जिवंतपणी बहिरे... मृत्यूनंतर शोकसभा!

लोकशाहीत उपोषण हा सत्ताधाऱ्यांच्या विवेकाला घातलेली शेवटची हाक असते. पण आजच्या सत्तेला ही हाक ऐकू येते का? की आंदोलकाचा श्वास थांबेपर्यंत सरकारचे कान बंदच राहतात? हा प्रश्न आज प्रत्येक जागरूक भारतीयाला पडला आहे.

आठ वर्षांपूर्वी, २०१८ मध्ये आयआयटी कानपूरचे माजी प्राध्यापक प्रा. जी. डी. अग्रवाल (स्वामी ज्ञानस्वरूप सनंद) यांनी गंगा मातेच्या रक्षणासाठी १११ दिवस उपोषण केले. त्यांची मागणी वैयक्तिक नव्हती, पद नव्हते, सत्ता नव्हती. फक्त गंगेचा अविरत प्रवाह, प्रदूषणमुक्ती आणि पर्यावरणाचे रक्षण. पण जिवंत असताना सरकारने, विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांची पुरेशी दखल घेतली नाही. उपोषणाच्या शेवटच्या टप्प्यातही आश्वासन दिले गेले नाही. मात्र ११ ऑक्टोबर २०१८ रोजी त्यांचा मृत्यू झाल्यावर लगेच शोकसंदेश आणि ट्विट आले. "गंगा स्वच्छतेची त्यांची आवड कायम स्मरणात राहील." हे काय आहे? जिवंतपणी बहिरेपणा आणि मृत्यूनंतर राजकीय शोकसभा! हे नाटक जनता ओळखते.

गंगेच्या नावाने 'नमामि गंगे' सारखी मोठी योजना आणली गेली. हजारो कोटी रुपये खर्च झाले. प्रोजेक्ट्स, घोषणा, फोटोसेशन्स... पण गंगा स्वच्छ झाली का? आजही प्रदूषण कायम, अविरत प्रवाह नाही. कोट्यावधी रुपये खर्च करूनही परिणाम शून्य. एका सच्च्या संन्यासी-वैज्ञानिकाचा बळी गेला, तरी गंगा तशीच राहिली. हा फक्त अपयश नाही, तर नैतिक दिवाळे आहे.

दिल्लीच्या जंतर-मंतरवर क्लायमेट ॲक्टिव्हिस्ट सोनम वांगचुक २० दिवसांपासून उपोषण करत आहेत. लडाखच्या संवैधानिक मागण्या, पर्यावरण आणि परीक्षा घोटाळ्यांविरोधात. सरकारकडून? पूर्ण मौन. पुन्हा तेच चित्र – जिवंत




असताना दुर्लक्ष, मृत्यू झाल्यावर बनावटी दुःख आणि श्रद्धांजली. हे सरकार निर्लज्जपणाचे शिखर आहे. लोकशाहीत संवाद हवा असतो, उपोषण नव्हे. पण संवाद नाकारला जात असेल तर आंदोलने अपरिहार्य होतात.

**२० जुलैला एकत्र येण्याची गरज**

या पार्श्वभूमीवर २० जुलैला सर्व राजकीय पक्षांनी आपले मतभेद विसरून दिल्लीत संसदेवर मोठा मोर्चा काढण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हा क्षण ऐतिहासिक आहे. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सोनम वांगचुक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे आजच्या काळाची गरज आहे. सर्व विरोधकांनी आणि जनतेने एकत्र येऊन सरकारला स्पष्ट संदेश द्यावा – आता पुरे! जिवंत कार्यकर्त्यांना ऐका, अन्यथा इतिहास तुम्हाला कधीही माफ करणार नाही.

शिक्षण क्षेत्रात तर अराजकता शिगेला पोहोचली आहे. NEET परीक्षेतील कथित पेपर लीक आणि अनियमिततांमुळे लाखो विद्यार्थी आणि पालक रस्त्यावर आहेत. सरकार मात्र गप्प. CBI चौकशी, समित्या – हे सगळे दिखाऊ उपाय. एकही मोठा राजकीय जबाबदारी स्वीकारली नाही. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी घेऊन राजीनामा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाला तर देशाचे भविष्यच धोक्यात येईल.

दुसरीकडे, इथेनॉल मिश्रित पेट्रोल (E20) धोरणावर वादळ आहे. वाहनधारक तक्रारी करत आहेत – मायलेज कमी, इंजिनला समस्या. पण रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी प्रोफेसरासारखे भाषण देतात – "एका गाडीचे नाव सांगा जी खराब झाली!" "फेक नॅरेटिव्ह, पेट्रोल लॉबीचे षड्यंत्र!" पेट्रोलियम मंत्री मात्र मौन. जनतेच्या अनुभवांना महत्त्व नाही, फक्त धोरणाचे गौरवगान. हे कसे चालेल? धोरणे जनहितासाठी असतात, जनतेच्या तक्रारी दाबण्यासाठी नव्हे.

सत्ता जनतेच्या विश्वासावर चालते, प्रचार आणि ट्विट्सवर नाही. मोदी सरकार 'विकसित भारत'चे स्वप्न दाखवते, पण वास्तवात पर्यावरणवादी मरतात, विद्यार्थी फसवले जातात, नद्या प्रदूषित राहतात आणि कार्यकर्त्यांकडे कानाडोळा केला जातो. टीकेला 'विरोधकांचे षड्यंत्र' म्हणण्यापेक्षा संवाद साधा, उत्तर द्या, जबाबदारी स्वीकारा.

जिवंत माणसाच्या आक्रोशापेक्षा मृत्यूनंतरची श्रद्धांजली मोठी ठरू लागली तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. देशाला भाषणं नव्हे, तर कृती हवी आहे. घोषणा नव्हे, उत्तरदायित्व हवे आहे. प्रचार नव्हे, परिणाम हवे आहेत.

इतिहास भाषणांनी नव्हे, तर योग्य वेळी घेतलेल्या निर्णयांनी आणि जनतेचा विश्वास जिंकणाऱ्या कृतींनी अमर होतो. २० जुलैला सर्व पक्ष एकत्र येऊन सोनम वांगचुक यांच्या पाठीशी उभे राहोत. वेळ अजून आहे – ऐका, समजून घ्या आणि कृती करा. अन्यथा इतिहास तुम्हाला कधीही माफ करणार नाही.

---

# विष्णुपुरी येथील संरचना भिंत कोसळल्या प्रकरणी वंचित चे काम बंद आंदोलन

## राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक व कंपनीवर तात्काळ गुन्हा दाखल करा - अक्षय बनसोडे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विनोद गच्चे :** राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वरील विष्णुपुरी येथील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलालगतची संरचना भिंत कोसळल्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी वंचित बहुजन युवा आघाडीतर्फे काम बंद आंदोलन करण्यात आले.

या घटनेची चौकशी येत्या ८ दिवसात पुर्ण करून दोषींवर कारवाई करण्यात आली नाही तर या मार्गावरील सर्व कामे बंद करण्यात येतील असा इशारा युवा



आघाडीचे प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे यांनी दिला.

यावेळी 1) विष्णुपुरी येथील घटनेची उच्चस्तरीय व स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्यात यावी. 2) दोषी आढळणाऱ्या कंत्राटदार कंपनी व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी. 3) संपूर्ण पुलाची व संबंधित संरचनांची सुरक्षा तपासणी करून अहवाल सार्वजनिक करण्यात यावा. 4) चौकशी पूर्ण होऊन दोषींवर कार्यवाही होईपर्यंत संबंधित पुलावरील व या मार्गावरील चालु सर्व कामे तात्काळ स्थगित करण्यात यावीत. 5) या महामार्गाचे काम करणाऱ्या KTIL कंपनी तसेच राष्ट्रीय महामार्गचे प्रकल्प संचालक महेश पाटील व इंजिनिअर आनंद पुयड यांच्यावर कारवाई करुन संबंधित कामाचे सर्व अधिकारी काढुन घ्यावेत. अशा विविध मागण्यांसाठी वंचित बहुजन युवा आघाडी नांदेड दक्षिण महानगरच्या वतीने आंदोलन अजय मांजरमकर, यशस पोवळे आदींची उपस्थिती होती.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# निफाड तालुका काँग्रेस अध्यक्षपदी साहेबराव पाटील ढोमसे; पदग्रहण व विविध सेल अध्यक्षांचा सत्कार सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी साहेबराव पाटील ढोमसे यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांचा पदग्रहण सोहळा तसेच तालुक्यातील विविध काँग्रेस सेल अध्यक्षांचा सत्कार सोहळा गुरुवारी निफाड येथील काँग्रेस भवनात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजाराम पाटील पानगव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला नाशिक जिल्हा काँग्रेस (उत्तर) अध्यक्ष रमेश कहांडोळ यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी आदी काँग्रेसच्या दिवंगत नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते साहेबराव पाटील ढोमसे यांनी तालुकाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विविध काँग्रेस सेलच्या नव्या पदाधिकाऱ्यांनीही पदभार स्वीकारला.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात काँग्रेस संघटना तळागाळात अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने गावागावांत सक्रिय राहण्याचे आवाहन केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष बळकट करण्यासाठी एकजुटीने काम करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.





नवनियुक्त तालुकाध्यक्ष साहेबराव पाटील ढोमसे यांनी सत्काराला उत्तर देताना, "काँग्रेसची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविणे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणे, युवक, महिला आणि शेतकऱ्यांना पक्षाशी जोडून संघटना अधिक मजबूत करणे हे माझे प्रमुख उद्दिष्ट राहील. राजाराम पाटील पानगव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने निफाड तालुक्यात काँग्रेसचा सुवर्णकाळ पुन्हा आणण्यासाठी जीवाचे रान करून काम करणार," अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमात मधुकर शेलार आणि सचिन होळकर यांनी सत्ताधारी पक्षाच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून काँग्रेस कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्याची गरज व्यक्त केली. कार्यकर्त्यांना संघटनात्मक प्रशिक्षण देणे आवश्यक असून सरकारच्या धोरणांतील त्रुटी जनतेसमोर मांडणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

मधुकर ढोमसे यांनी काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असून पक्षाला पुन्हा चांगले दिवस येतील, असा विश्वास व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी मरगळ झटकून संघटन वाढीसाठी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. "भाजप हा लाभाचा पक्ष तर काँग्रेस हा त्यागाचा पक्ष आहे. अनेक पक्षांकडून ऑफर येऊनही काँग्रेसने मला खूप काही दिले असल्याने मी पक्षाचा एकनिष्ठ शिलेदार राहिलो असून पुढेही राहणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजाराम पाटील पानगव्हाणे यांनी १९९२ पासून काँग्रेसमध्ये कार्यरत असल्याचे सांगत साहेबराव ढोमसे यांनी पक्षाला लहान भावाप्रमाणे साथ दिल्याचे नमूद केले. तालुक्यातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या आग्रहास्तव त्यांच्यावर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देश व राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी भ्रष्टाचार वाढल्याचा आरोप केला. केंद्र व राज्य सरकार तळागाळातील जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका त्यांनी केली. "निफाड तालुक्यात काँग्रेस स्वबळावर निवडणुका लढवेल. हार-जीत हा लोकशाहीचा भाग असला तरी संघर्षाची भूमिका कायम राहील," असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमात रमेश कहांडोळ, दिंगबर गिते, प्रकाश अडसरे, गुणवंत होळकर, निर्मलाताई खर्डे,गौरव पानगव्हाणे, मधुकर ढोमसे,भाऊसाहेब शिंदे, रोहिणी शेळके,जावेद मणियार, संजय थेटे, नाना हिरे, बबन गांगुर्डे, जितेंद्र थेटे, शंकर भोगे, जयराम गवारे, अनर शेख, रामराव मोरे, आरिफ इनमादार, जयशोद्दीन तांबोळी, शरद जाधव, रंगनाथ कुर्णे, बाशीर मुलाणी, सोनू इनामदार, डॉ.साईनाथ ढोमसे, गणपत ढोमसे,बाळासाहेब जाधव, एकनाथ निकम, नंदू अहिरे, प्रमोद आहिरे, शकील शेख, विष्णुपंत पानगव्हाणे, विजू वाबळे, राजाभाऊ होळकर,पंडित ढोमसे, जितेंद्र ढोमसे,महेश ढोमसे, दत्ता ढोमसे, माधव चव्हाण,संदीप पानगव्हाणे,संपत ढोमसे,संदीप वाबळे, नाना ढोमसे, सुधाकर ढोमसे,रमेश ढोमसे,जावेद शेख,मधुकर वाबळे, रमेश ढोमसे, नाना हिरे, केदु पानगव्हाणे, रमेश वाघ यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक सुहास सुरळीकर यांनी केले, तर अन्वर शेख यांनी आभार मानले. पदग्रहण सोहळयास तालुक्यातील काँग्रेस पदाधिकारी, विविध सेलचे प्रतिनिधी, महिला काँग्रेस, युवक काँग्रेसचे कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# अवयवदानाचा संकल्प घेत निफाडची सायकल वारी उत्साहात पंढरपुरात

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर भक्ती, फिटनेस आणि समाजसेवेचा प्रेरणादायी संगम घडवत निफाड सायकलिस्टच्या ४० सदस्यांनी सायकलवरून पंढरपूरची वारी यशस्वीरीत्या पूर्ण केली. श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतानाच सर्व सदस्यांनी अवयवदानाचा संकल्प करून समाजापुढे मानवतेचा आदर्श ठेवला. पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारी ही वारी यंदा सामाजिक जनजागृतीमुळे विशेष ठरली.



दिनांक १० जुलै रोजी निफाड येथून या सायकल वारीला प्रारंभ झाला. अवघ्या दोन दिवसांत सुमारे शेकडो किलोमीटरचा प्रवास पूर्ण करत सायकलस्वार पंढरपूर येथे पोहोचले. तेथे शहर फेरी, नगर प्रदक्षिणा, रिंगण सोहळा आणि श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन वारीचा समारोप करण्यात आला. संपूर्ण प्रवासादरम्यान 'अवयवदान करा', 'झाडे लावा-झाडे जगवा', 'सायकल चालवा-इंधन वाचवा' आणि 'सायकल चालवा-आरोग्य राखा' अशा प्रभावी संदेशांचे फलक घेऊन जनजागृती करण्यात आली.

वारीतील रिंगण सोहळा हा सहभागींसाठी अविस्मरणीय अनुभव ठरला. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील सुमारे चार हजार सायकलस्वार या सोहळ्यात सहभागी झाले होते. विविध रंगांच्या जर्सी, प्रत्येक क्लबची वेगळी ओळख आणि जिल्हानिहाय प्रतिनिधित्व असले तरी सर्वांच्या ओठांवर विठ्ठलाचे नाम आणि मनात सायकलप्रेमाची एकच भावना होती. या अनोख्या वातावरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाला.

यंदाच्या वारीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अवयवदान जनजागृती अभियान. निफाड सायकलिस्टच्या सर्व ४० सदस्यांनी स्वेच्छेने अवयवदानाचा संकल्प करून समाजात सकारात्मक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. भक्तीबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वही जोपासता येते, याचा आदर्श या उपक्रमातून निर्माण झाला.

याशिवाय पर्यावरण संरक्षणासाठी सायकलचा वापर, वाढते प्रदूषण रोखणे, इंधनाची बचत करणे आणि नियमित सायकलिंगद्वारे निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा संदेशही या वारीतून देण्यात आला. या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, धार्मिक परंपरेला सामाजिक जाणिवेची जोड देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला आहे.

या सायकल वारीत निफाड सायकलिस्टचे प्रणेते प्रवीण तनपुरे, अध्यक्ष पांडुरंग कडवे, उपाध्यक्ष अशोक कोल्हे, पंढरपूर वारी प्रमुख संदीप गवळी, सचिव दीपक घंगाळे, राजेंद्र गवळे, तसेच रणरागिणी डॉ. सीमा डेरले, पूजा मगर, मनीषा वाघ, साक्षी तांबे, वैभव ताकटे, ओंकार घंगाळे, ॲड. रामनाथ शिंदे, आकाश दौंड, संतोष काजळे, शहाजी चोपडे यांच्यासह अन्य सदस्य उत्साहाने सहभागी झाले होते.

निफाड सायकलिस्टच्या या उपक्रमाने धार्मिक श्रद्धा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा सुंदर संगम घडवून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

# ऑगस्ट पासून पनवेल महापालिका हद्दीवर 'तिसऱ्या डोळ्याची' नजर

## 1 हजार सीसीटीव्ही कार्यान्वित करण्याचे नियोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल हद्दीतील महापालिका नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाढत्या गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका तर्फे महत्त्वाकांक्षी सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सुमारे 142 कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पांतर्गत महापालिका हद्दीतील शहरे आणि गावांमध्ये 1000 अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे जसविण्यात येत असून, येत्या ऑगस्ट महिन्यापासून संपूर्ण सीसीटीव्ही कॅमेरे यंत्रणा कार्यान्वित होणार आहे.

> पनवेल महापालिका हद्दीतील महिला, मुली आणि सर्व नागरिकांच्या सुरक्षिततेसह वाढत्या गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प राबविण्यात येत आहे. येत्या ऑगस्ट महिन्यापासून सर्व सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.
>
> - मंगेश चितळे, आयुक्त पनवेल महापालिका.

रायगड जिल्ह्यातील पहिली महापालिका असलेल्या पनवेल महापालिका हद्दीत खारघर, तळोजा, कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल या सिडको वसाहतींसह 29 महसुली गावांचा समावेश आहे. झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, उभारले जाणारे गृहप्रकल्प आणि वाढती वर्दळ लक्षात घेता सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे यंत्रणा उभारण्यात येत आहे. महापालिका आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे केलेल्या सर्वेक्षणानुसार मुख्य रस्ते, महत्त्वाचे चौक, सिग्नल, बाजारपेठा, उद्याने, मैदाने तसेच महापालिका हद्दीत प्रवेश आणि नाहेर पडणारे प्रमुख मार्ग येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत. या प्रकल्पात 360 अंशांमध्ये दृश्य टिपणारे उच्च दर्जाचे तसेच सुमारे 100 मीटर अंतरापर्यंत स्पष्ट प्रतिमा टिपण्याची क्षमता असलेले कॅमेरे बसविण्यात येत आहेत. वादळी वाऱ्याचा परिणाम होऊ नये म्हणून कॅमेऱ्यांसाठी स्वतंत्र मजबूत खांब उभारले जात आहेत. अनेक ठिकाणी कॅमेऱ्यांसह स्पीकरचीही व्यवस्था करण्यात येणार असून, आपत्कालीन किंवा अनुचित घटना घडल्यास नियंत्रण कक्षातून नागरिकांना तात्काळ सूचना देता येणार आहेत.

या संपूर्ण सीसीटीव्ही कॅमेरे यंत्रणेवर कामोठे येथील महापालिका नियंत्रण कक्षातून तसेच पोलीस उपायुक्त (परिमंडळ-2) कार्यालयातील नियंत्रण कक्षातून देखरेख ठेवली जाणार आहे. त्यामुळे महापालिका हद्दीत प्रवेश करणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या संशयित व्यक्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, गुन्ह्यांचा तपास आणि आरोपींचा माग काढणे अधिक सुलभ होणार आहे.

**पावसाळ्यानंतर 400 कॅमेरे कार्यान्वित**

पनवेल महापालिका हद्दीतील एमएसआरडीसी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत 400 सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. त्यासाठी परवानगीची प्रक्रिया सुरु आहे. पावसाळ्यात विद्युत खांब उभारणी आणि केबल वाहिन्या जोडताना येणाऱ्या अड्चणी लक्षात घेवून पावसाळानंतर 400 सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित केले जाणार आहेत.

**महिला-विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे पाऊल**

पनवेल महापालिका हद्दीतील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सुमारे तीन लाख विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. दररोज हजारो महिला, विद्यार्थिनी आणि नोकरदार महिला घराबाहेर पडतात. या परिस्थितीत वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर सीसीटीव्ही यंत्रणा महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी ठरणार असून, छेडछाड, चोरी, मारहाण आणि इतर गुन्ह्यांवर प्रतिबंध घालण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# भोकरपाडा जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व छत्र्यांचे वाटप

## आमदार विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी प्रतिनिधी** : आमदार विक्रांत पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भोकरपाडा येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व छत्र्यांचे वाटप करण्यात आले. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देतानाच पावसाळ्यातही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, या उद्देशाने हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.






यावेळी आमदार विक्रांत पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, "आजचे विद्यार्थी हे उद्याच्या सक्षम व सुजाण पनवेलचे शिल्पकार आहेत. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देणे ही लोकप्रतिनिधी म्हणून माझी जबाबदारी आहे. समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी मिळावी, यासाठी भविष्यातही असे लोकाभिमुख उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील," असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास ज्येष्ठ सहकारी पुंडलिक फडके, युवाशक्ती संघाचे अध्यक्ष आकाश पाटील, वावंजेचे उपसरपंच विकास पाटील, सखाराम फुलोरे, बाळकृष्ण म्हात्रे, रामचंद्र फुलोरे, हरीभाऊ म्हात्रे, देविदास खेडकर, अशोक भोईर, निलेश कांबळे, श्रीनाथ भोपी, दर्शन म्हात्रे, नामदेव फुलोरे, हरिश्चंद्र फुलोरे, जोमा फुलोरे, बामाजी फुलोरे, सतीश म्हात्रे, दिलीप फुलोरे, प्रदीप म्हात्रे, शिवराम फुलोरे, धुलाजी फुलोरे, गणेश फुलोरे, मुरलीधर म्हात्रे, राम फुलोरे, संतोष फुलोरे, स्वप्निल फुलोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन युवा सहकारी विघ्नेश फुलोरे, किरण म्हात्रे आणि संकेत फुलोरे यांनी केले. उपस्थित शिक्षक, पालक, विद्यार्थी व नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे कौतुक केले.

# द्राक्ष व्यापाऱ्यांचा शेतकऱ्यांना साडेबावीस लाखांचा चुना ! परप्रांतीय दोघांवर गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत परिसरात द्राक्ष खरेदीच्या व्यवहारातून तीन शेतकऱ्यांची तब्बल २२ लाख ५९ हजार ३८९ रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विश्वास संपादन करून द्राक्षमालाचा ताबा घेतल्यानंतर उर्वरित रक्कम न देता परप्रांतीय दोघा व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना साडेबावीस लाखांचा चुना लावल्याप्रकरणी पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी चंदन संपत खोडे (वय ४०, रा. बेंदमळा, वणी रोड, पिंपळगाव बसवंत) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी सज्जन रामप्रकाश साह (रा. बेगुसराय, बिहार) व ओमप्रकाश यादव (रा. उत्तर प्रदेश) यांनी फिर्यादीसह किरण रामकृष्ण तिडके आणि दत्तात्रय दामू जाधव यांचा विश्वास संपादन करून सर्व्हे क्रमांक ६०१ मधील तीन बिघे क्षेत्रातील १७७ क्विंटल द्राक्षमाल प्रतिकिलो ७१ रुपये दराने खरेदी केला. मात्र, द्राक्षमालाचा ताबा



घेतल्यानंतर ३० मार्च २०२६ पासून आजपर्यंत २२,५९,३८९ रुपयांची उर्वरित रक्कम अदा न करता शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी गुन्हा क्रमांक २०६/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३१६(२), ३१६(५) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल आव्हाड पुढील तपास करीत आहेत.द्राक्ष उत्पादकांची फसवणूक करणाऱ्या अशा व्यापाऱ्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

## शिवसेनेच्या पुढाकारातून सणसरमध्ये 'आरोग्यवारी'; हजारो नागरिकांना मोफत आरोग्यसेवेची संजीवनी



**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथे शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून समर्थ युवा फाउंडेशन व नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्यवारी'या उपक्रमांतर्गत भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात सर्वसामान्य नागरिकांना विविध आजारांचे निदान,तपासणी व आवश्यक उपचारांचा लाभ पूर्णपणे मोफत देण्यात आला.शिबिरामध्ये दातांची तपासणी,कीड काढणे व सिमेंट भरणे,सर्वसाधारण आरोग्य तपासणी व उपचार,महिलांसाठी मॅमोग्राफीद्वारे स्तन कर्करोग तपासणी,डोळ्यांची तपासणी (मोतीबिंदू व काचबिंदू)रक्तातील साखर, रक्तदाब (बीपी),रक्तगट तसेच रक्तातील विविध घटकांची तपासणी करण्यात आली.याशिवाय महिला व पुरुषांना मोफत चष्म्यांचेही वाटप करण्यात आले.

यावेळी शिवसेना महिला जिल्हाप्रमुख विद्याताई गायकवाड,शिवसेना वैद्यकीय इंदापूर तालुकाप्रमुख सुनील निंबाळकर,माजी सरपंच राहुल काळे, सोसायटी संचालिका रेखा निंबाळकर,राहुल जगताप,निलेश भाग्यवंत,मिलिंद गाडेकर,सागर भाग्यवंत,अतुल घोडे,मुबारकभाई सय्यद,काका निंबाळकर,गणेश निंबाळकर,मनोज निंबाळकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अनेकांना वेळेत आजारांचे निदान व उपचाराची संधी मिळाली.या आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी इंदापूर तालुका शिवसेना वैद्यकीय प्रमुख सुनील निंबाळकर यांनी, "ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असून जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा,"असे आवाहन केले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी आरक्षण उपवर्गीकरण जाहीर करा : सचिन साठे

### सिल्लोडमध्ये सकल मातंग समाज व कृती समितीचा 'संविधानीक न्याय हक्क महामोर्चा'; प्रशासनाला दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या अहवालानुसार, अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाचा (अ, ब, क, ड) निर्णय तातडीने जाहीर करण्याच्या मागणीसाठी सिल्लोड येथे सकल मातंग समाज व 'आरक्षण उपवर्गीकरण समर्थन कृती समिती'च्या वतीने भव्य 'संविधानीक न्याय हक्क महामोर्चा' काढण्यात आला.

ए. बी. एस. क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे मोर्चाला संबोधित करताना म्हणाले की, "मा. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी आरक्षण उपवर्गीकरणासंदर्भात राज्य सरकारला निर्देश दिलेले आहेत. तसेच, राज्य सरकारने नेमलेल्या न्यायमूर्ती अनंत बदर समितीनेही आपला अहवाल सरकारला सादर केला आहे. त्यामुळे, कोणत्याही दबावाला बळी न पडता राज्य सरकारने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी (१ ऑगस्ट) अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय जाहीर करून त्याची तातडीने अंमलबजावणी



करावी."

यावेळी उपस्थितांनी आपल्या मागण्यांचे निवेदन परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा सिल्लोडच्या तहसीलदार अंकीता ताकभाते यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केले.

या महामोर्चात लहुजी क्रांती सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अशोकराव कांबळे , प्रदेश उपाध्यक्ष सखाराम आहीरे, भारतीय दलित संसदेचे अध्यक्ष अंबादास सगट, लहुजी क्रांती सेनेचे प्रदेश सचिव कैलास पाजगे, अण्णाभाऊ साठे फाउंडेशनचे अध्यक्ष राजु भालेराव आणि लहुजी क्रांती सेनेचे मराठवाडा अध्यक्ष नानासाहेब गायकवाड यांनी मोर्चाला संबोधित केले.

मोर्चाचे सूत्रसंचालन फकीरचंद तांबे यांनी केले, तर आभार विजय खाजेकर यांनी मानले.यावेळी कमलताई घाडगे, सुवर्णाताई साबळे, सामाजिक कार्यकर्ते साहेबराव सोनवणे, विष्णू सोनवणे, नामदेव खेत्रे , सोमिनाथ भालेराव, सुधाकर कासारे, विनायक वाघुले, संजय कांबळे, सागर खेत्रे, संजय आहीरे, कैलास खरात, समाधान गायकवाड, अशोक शिंदे, बाबुराव आहीरे, संजय मोरे, समाधान लोखंडे, फकिरचंद तांबे, साहेबराव आहीरे , साहेबराव दनके, रतन अंभोरे, सुखदेव कांबळे, शिवराम कांबळे, सर्जेराव शेजुळ, राजेंद्र गोफणे, किसन सौदागर, रविंद्र महाले, दुर्गादास जाधव, सखाराम भिसे, कचरु उन्होने, महेंद्र आहीरे, विष्णू सौदागर, ज्ञानेश्वर नाडे, समाधान कांबळे, भगवान सोनवणे, सुनिल आहीरे, विशाल आहीरे, बाजीराव कांबळे, विठ्ठल कांबळे, आकाश आहीरे, कैलास मोरे, विष्णू साळवे, अमोल खेत्रे, किशोर भिसे , दिपक कांबळे, विलास घोरपडे, दत्तु आहीरे, संदीप चंदनशिवे, कैलास भाले, मच्छींद्र बहीलम, दिपक लोखंडे, रवि दनके, सतिश शेलार, नितीन दनके, गजानन कांबळे, विठ्ठल खोतकर, रमेश आहीरे, आनंदा खेत्रे, नितीन सौदागर, प्रदीप साठे, सोमिनाथ कांबळे, संजय पारधे, पुंजाराम कांबळे, आकाश गायकवाड, जनार्दन दनके, कृष्णा सोनवणे, अमोल काकफळे, गजानन चंदनशिव, सुभाष कांबळे, कपिल शेजुळ, आनंद गायकवाड यांच्यासह हजारो समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत शनिवारी व रविवारी विशेष शिबिर

### नागरिकांनी सहभागी होण्यासाठी प्रशासनाचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) – २०२६ कार्यक्रम सध्या 188 पनवेल विधानसभा मतदार केंद्रात सुरू आहे. या अतंर्गत मतदारांच्या सोयीसाठी 574 विधानसभा मतदान केंद्रावरती येत्या शनिवार दिनांक 18 जुलै व रविवार दिनांक 19 जुलै रोजी विशेष शिबिराचे आयोजन सकाळी 10.00 ते संध्याकाळी 4.00 वाजेपर्यंत करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये बिएलओ( बुथ लेव्हल ऑफीसर) विधानसभेच्या यादीभागानुसार मतदान केंद्रावर उपस्थित राहणार आहेत .गणना अर्जाचे (इन्युमरेशन फॉर्म) वाटप व संकलन शिबिरात केले जाणार आहे. तसेच मतदारांच्या एसआयआर अर्जाबाबत काही शंका असतील तर त्यांचे निरसन केले जाणार आहे. पनवेल विधानसभा मतदार संघातील एकही पात्र मतदार मतदार यादीतून वगळला जाणार नाही या करीता मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाच्यावतीने




करण्यात आले आहे.

एसआयआर कार्यक्रमांतर्गत दि. ३० जून ते 29 जुलै २०२६ या कालावधीत पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक घराला बूथ लेव्हल अधिकारी (BLO) भेट देत आहेत. या उपक्रमास नागरिकांनी सक्रिय प्रतिसाद देऊन बीएलओंना आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. घरभेटीदरम्यान बीएलओंकडून आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी केली जाणार असून नागरिकांनी त्यांना योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी केले आहे.

मतदारांनी स्वत: गणना अर्ज भरण्यासाठी voters.eci.gov.in किंवा ECINet App वर जाऊन स्वतःचा तसेच कुटुंबातील सदस्यांचा मतदार यादीतील तपशील तपासून गणना अर्ज भरावा. तसेच शनिवारी व रविवारी मतदार नेहमी ज्या मतदान केंद्रावर मतदानासाठी जातात त्याच मतदान केंद्रावर आपले गणना अर्ज भरण्यासाठी जावे. ज्या मतदाराचे अथवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे नाव मतदार यादीत नसल्यास त्यांनी जन्माचा दाखला, शैक्षणिक प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड किंवा इतर आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत.

पनवेल विधानसभा मतदार संघातील सर्व राजकीय पक्षांना प्रशासनाच्या वतीने आवाहन आहे की आपले बिएलए यांना सदर शिबिरामध्ये सहभाग घेऊन पात्र मतदारांचे गणना अर्ज भरून घेणे करीता सहकार्य करावे.


# आमदुरा येथे गोदावरी नदीच्या पुलावरून कार पाण्यात शिक्षकासह दोन चिमुकल्यांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:-प्रकाश गवारे** : नांदेड जिल्ह्यातील आमदुरा (शिकारघाट) येथील गोदावरी नदीवरील पुलावरून आज दि. १७ जुलै२०२६ शुक्रवारी सकाळी सुमारे ७:०० वाजण्याच्या सुमारास एक कार नदीत कोसळल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. या घटनेत जि.प. प्राथमिक शाळा पोटा बु. येथील शिक्षक सुनील नारायणराव मोरे वय ४२, त्यांची मुलगी सारा सुनील मोरे

वय १४ आणि मुलगा सुमेध सुनील मोरे वय ११ यांचा मृत्यू झाला. सुनील मोरे हे मूळचे बेंबर ता. भोकर येथील रहिवासी असून नांदेड येथे वास्तव्यास होते.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, SDRF तसेच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बचाव पथकाने सुमारे १०:३६ वाजता तिघांचेही मृतदेह नदीतून बाहेर काढले. त्यानंतर मृतदेह पुढील वैद्यकीय व कायदेशीर



प्रक्रियेसाठी पाठविण्यात आले.

दरम्यान, या घटनेनंतर सोशल मीडियावर सुनील मोरे यांनी स्व:ता काही संदेश आणि स्टेटस मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत आहेत. त्यामध्ये काही व्यक्तींवर गंभीर आरोप करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या संदेशांची सत्यता तसेच त्यातील आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

पोलीस या घटनेचा सर्व बाजूंनी तपास करत असून, मृत्यूमागील नेमके कारण तपासाअंतीच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अपुष्ट माहितीवर विश्वास न ठेवता अधिकृत तपास अहवालाची प्रतीक्षा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, दिवंगत शिक्षक आणि त्यांच्या दोन्ही चिमुकल्यांना विविध स्तरांतून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# स्कूल बस युनियन महागावकडून ठाणेदार सेवानंद वानखडे यांचा सत्कार; वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव, यवतमाळ** : स्कूल बस युनियन, महागावच्या वतीने महागाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ठाणेदार वानखेडे यांनी उपस्थित सर्व स्कूल बस चालकांना वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन केले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. वाहन चालविताना वेगमर्यादा पाळणे, वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे, वाहनाची नियमित तपासणी करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला स्कूल बस युनियन, महागावचे अध्यक्ष सुरेशराव यशवंत नरवाडे, उपाध्यक्ष प्रविणभाऊ तुकाराम सूर्यवंशी, सचिव प्रमोद संभाजी नरवाडे यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वाहन चालक संजय राऊत, शुभम राऊत, लखन राठोड, बबन आडे, बाळू शिंदे, प्रमोद काळे, प्रल्हाद काठे, अक्षय वानखेडे, बाळू भाकरे, शाम सोळंके, रवि सोळंके, राजूभाऊ




गोबडे, विनोद जाधव, संतोष वढते, पांडुरंग वानखेडे, सुरेंद्र वानखेडे, राम आडे, सचिन पाटील, प्रेम राठोड, संदीप दौलतदार, पंडित राठोड, रवि वानखेडे, अंकुश जाधव, प्रविण बुलबुले, जावेद खान, अमोल जाधव, इंगळे काका, अमोल अडकिने, संजय ठाकरे, लक्ष्मण पाटे, रुपेश भांगे, जीवन नरवाडे, राजु गावंडे,गजानन गावंडे, सदानंद भरवाडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात वाहतूक सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी सर्व चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे प्रामाणिकपणे पालन करण्याची ग्वाही दिली.

# साउथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर, नागपूर यांच्यातर्फे '३३ व्या डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती संगीत महोत्सवा'चे भव्य आयोजन


**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर** : या महोत्सवाला संगीतमय प्रवासाची ३२ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभली आहे.अत्यंत उत्सुकतेने प्रतीक्षित असलेल्या या कार्यक्रमात शास्त्रीय गायन, वाद्यसंगीत आणि संगीत नाटकांचे सादरीकरण होणार आहे. यंदाही अनेक दिग्गज कलाकार यात सहभागी होणार आहेत.

**डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती संगीत महोत्सव – "एक संगीतमय प्रवास"**

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या 'साउथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर' (SCZCC), नागपूर यांच्यातर्फे प्रतिष्ठित '३३ व्या डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती संगीत महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध गायक-अभिनेते डॉ. वसंतराव देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित हा महोत्सव २९ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत, दररोज सायंकाळी ६:३० वाजता 'डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृह', सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे पार पडणार आहे.

भारतीय शास्त्रीय संगीत आणि



संगीत-नाट्य परंपरेच्या संवर्धनासाठी व प्रसारासाठी हा महोत्सव एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरला आहे. या महोत्सवाची प्रतिष्ठा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी SCZCC ने गेल्या काही वर्षांत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त कलाकार आणि उदयोन्मुख प्रतिभा यांच्या सहभागामुळे या कार्यक्रमाची प्रतिष्ठा सातत्याने उंचावली आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नागपूरसह संपूर्ण भारतातील संगीत आणि कलाप्रेमींना विविध कलाप्रकारांचा अनुभव घेण्याची संधी मिळाली आहे; यात शास्त्रीय गायन, वाद्यसंगीत, संगीत नाटक आणि भारतीय शास्त्रीय नृत्य यांचा समावेश असून, यात देश-विदेशातील दिग्गज कलाकारांनी सादरीकरण केले आहे.

महोत्सवाच्या सुरुवातीपासूनच स्थानिक कलाकार, संगीत संस्था आणि दिवंगत डॉ. वसंतराव देशपांडे यांच्याशी घनिष्ठ संबंध असलेले कलाकार व रसिक यांना यात सहभागी करून घेण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न केंद्राने केले आहेत – आणि या कामगिरीचा केंद्राला अभिमान वाटतो. नागपूरमधील कलाप्रेमी, रसिक, संगीत तज्ज्ञ, समीक्षक, प्रसारमाध्यमे आणि सांस्कृतिक संस्थांनी या गौरवशाली प्रवासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीमुळे हा महोत्सव सातत्याने समृद्ध होत आला आहे आणि आज, आपल्या गौरवशाली परंपरेचे जतन करत, तो आपल्या ३३ व्या आवृत्तीचे आयोजन करत आहे.

"३३ व्या डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती संगीत समारोहा"साठीचे प्रवेश पास २१ जुलै २०२६ पासून 'साउथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर' (SCZCC), नागपूरच्या कार्यालयात सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत उपलब्ध असतील. हे पास संपूर्ण महोत्सवाच्या कालावधीसाठी वैध असतील आणि संपूर्ण कार्यक्रमासाठी प्रति व्यक्ती ५०० रुपये व ३०० रुपये असे नाममात्र शुल्क आकारले जाईल. कार्यक्रमाच्या दिवशी कार्यक्रमस्थळीही हे पास उपलब्ध असतील.

तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात शास्त्रीय गायन, वाद्यसंगीत आणि संगीत नाटकांचे सादरीकरण होणार आहे. मागील वर्षांप्रमाणेच, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त कलाकार यात सहभागी होणार आहेत. सहभागी कलाकार आणि कार्यक्रमाच्या वेळापत्रकाबाबतचा तपशील लवकरच जाहीर केला जाईल.

'साउथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर', नागपूरच्या संचालिका श्रीमती आस्था कारलेकर यांनी सर्व संगीतप्रेमी, रसिक श्रोते आणि कलाप्रेमींना या प्रतिष्ठित महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे, सादरीकरणांचा आनंद घेण्याचे आणि हा कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## गुंडवळ ग्रामपंचायत निधी गैरव्यवहार प्रकरणी आमरण उपोषणाचा चौथा दिवस

### प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष




**दैनिक युवक आधार:**

**श्रीक्षेत्र माहूरगड: प्रतिनिधी:सय्यद ईसा** : माहूर तालुक्यातील गुंडवळ ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहार, दलित वस्ती विकास निधीचा गैरवापर, घरकुल योजनेतील कथित अनियमितता आणि ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी तहसील कार्यालय, पंचायत समिती परिसर, माहूर येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा आज चौथा दिवस आहे.

उपोषणकर्त्यांनी संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह इतर कायद्यांनुसार कारवाई करावी, ग्रामपंचायतीच्या मागील तीन वर्षांच्या आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) करावे, तसेच घरकुल लाभार्थ्यांकडून झालेल्या कथित वसुलीची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

उपसरपंच राहुल सतपाल कांबळे, बाबू विश्वनाथ खंदारे आणि ग्रामस्थांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाला स्थानिक नागरिकांचा पाठिंबा मिळत असून, चौथ्या दिवशीही उपोषणकर्ते आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. अद्याप प्रशासनाकडून ठोस निर्णय जाहीर झालेला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन न्याय द्यावा, अन्यथा आंदोलनाची पुढील दिशा जाहीर करण्यात येईल, असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे. उपोषणाच्या चौथ्या दिवशीही तहसील कार्यालय परिसरात आंदोलन शांततेत सुरू असून प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आह

## शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांच्या हस्ते कोयाळी–मन्नास पिंपरी रस्त्याचे भूमिपूजन संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी. रणजीतसिह. ठाकुर** : रिसोड - श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोयाळी (बु.) परिसरातून मन्नास पिंपरी गावाच्या सीमेपर्यंतच्या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक (अमरावती विभाग) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी जिल्हा परिषद वाशिमचे मुख्य अभियंता . कंकाळे, शाळा समितीचे अध्यक्ष अरुणराव सरनाईक, गोपाल जाधव (इंजिनिअर), के. के. भिसडे (संचालक), प्रकाशराव शिरसाठ (संचालक), शंकरराव भिसडे (संचालक), भगवानराव भिसडे (संचालक), जब्बार भाई, मुक्तार देशमुख (मन्नास पिंपरी), प्रकाश पुरी, प्राचार्य आर. बी. भिसडे, प्रा. संतोष दिवटे, प्रा. सानप, प्रा. काळदाते, प्रदीप उकंडे, विजय शेळके, सी. के. इंगोले, मुंगल सर, परमेश्वर भिसडे, नंदूभाऊ भिसडे यांच्यासह कोयाळी व मन्नास पिंपरी येथील ग्रामस्थ, सर्व कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या प्रसंगी बोलताना शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक यांनी हा रस्ता विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून त्याच्या उभारणीमुळे परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होईल, असे सांगितले.

शाळा समितीचे अध्यक्ष . अरुणराव सरनाईक यांनी, या रस्त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळेत ये-जा अधिक सोयीची होणार असून श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीसंख्येत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर मराठवाडा व विदर्भाला जोडणारा हा मार्ग अधिक सुरक्षित, जलद आणि सर्वांसाठी सुखकर होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

प्राचार्य आर. बी. भिसडे यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, ग्रामस्थ व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

रिसोड - श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोयाळी (बु.) परिसरातून मन्नास पिंपरी गावाच्या सीमेपर्यंतच्या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक (अमरावती विभाग) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी जिल्हा परिषद वाशिमचे मुख्य अभियंता . कंकाळे, शाळा समितीचे अध्यक्ष अरुणराव सरनाईक, गोपाल जाधव (इंजिनिअर), के. के. भिसडे (संचालक), प्रकाशराव शिरसाठ (संचालक), शंकरराव भिसडे (संचालक), भगवानराव भिसडे (संचालक), जब्बार भाई, मुक्तार देशमुख (मन्नास पिंपरी), प्रकाश पुरी, प्राचार्य आर. बी. भिसडे, प्रा. संतोष दिवटे, प्रा. सानप, प्रा. काळदाते, प्रदीप उकंडे, विजय शेळके, सी. के. इंगोले, मुंगल सर, परमेश्वर भिसडे, नंदूभाऊ भिसडे यांच्यासह कोयाळी व मन्नास पिंपरी येथील ग्रामस्थ, सर्व कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक यांनी हा रस्ता विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून त्याच्या उभारणीमुळे परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होईल, असे सांगितले.

शाळा समितीचे अध्यक्ष . अरुणराव सरनाईक यांनी, या रस्त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळेत ये-जा अधिक सोयीची होणार असून श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीसंख्येत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर मराठवाडा व विदर्भाला जोडणारा हा मार्ग अधिक सुरक्षित, जलद आणि सर्वांसाठी सुखकर होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

प्राचार्य आर. बी. भिसडे यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, ग्रामस्थ व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## नगर परिषद उमरी येथे प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत घरकुल लाभार्थी यांना निधी वितरीत

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर रुपेशकुमार श्रीरामवार** : नगरपरिषद उमरी येथे प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत उमरी नगर परिषद हद्दीतील एकूण 105 लाभार्थी यांना 01 कोटी 05 लक्ष रुपये वितरित करण्यात आले या वेळी उपस्थित नगराध्यक्षा सौ.शकुंतला भगवान मुदीराज, उपनगराध्यक्ष मा.कैलासभाऊ देशमुख गोरठेकर,माजी नगराध्यक्ष प्रवीणभाऊ सारडा, गटनेते राजेश पाटील जाधव, बांधकाम सभापती संदीप चंदनवार महिला व



बालकल्याण सभापती निकिता सिंगरवाड, नियोजन सभापती विष्णूभाऊ पंडित ,नगरसेवक अनुसयाबाई कटकदवने , साईनाथ जमदाडे , गजानन अलसटवार, रतन खंदारे, बाबू बेग हुसेन बेग, एजास खान, गजानन खांडरे, इरबा शेळके, वसीम कुरेशी, अशोक झडते, शंकर शिंदे, अनंत रापणवाड, विकी रणनवरे, दीपक खांडरे, जावेद खान, नगरसेवक प्रतिनिधी कार्यालयीन अधीक्षक कांचन पडलवार , अभियंता कैलास यमलवाड, लेखापाल बालाजी चवरे, संगणक अभियंता सावंत सर, पूजा पावडे,CLTC शकील पठाण, वरिष्ठ लिपीक गणेश मदने कार्यालयीन कर्मचारी व नागरीक या वेळी उपस्थित होते.

## दारूच्या नशेत 'डायल ११२'चा गैरवापर; पत्नीवर अत्याचाराची खोटी कथा रचणारा पती गुन्ह्यात

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडंगे निफाड तालुका प्रतिनिधी** : दारूच्या नशेत 'डायल ११२' या आपत्कालीन सेवा क्रमांकावर फोन करून पत्नीवर तीन ते चार जणांनी अत्याचार करून मारहाण केल्याची खोटी माहिती देत पोलिसांची धावपळ उडविणाऱ्या धारणगाव वीर (ता. निफाड) येथील एका व्यक्तीविरुद्ध लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अस्लम समशेरुद्दीन शेख (वय ३३, रा. धारणगाव वीर) याने 'डायल ११२' वर कॉल करून पत्नीवर अत्याचार व मारहाण झाल्याची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक




सागर कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र, प्रत्यक्ष चौकशीदरम्यान तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नसल्याचे उघड झाले. आरोपीच्या पत्नीनेही पोलिसांना अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे स्पष्ट सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी अस्लम शेख याला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणी केली असता तो दारूच्या नशेत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल गणेश नागरे यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २१७ तसेच महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ८५(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कांदळकर करीत आहेत.

दरम्यान, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते यांनी नागरिकांना 'डायल ११२' ही जीव वाचविणारी आपत्कालीन सेवा असून तिचा गैरवापर करू नये. खोटे कॉल करून पोलिसांची दिशाभूल करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. केवळ वास्तविक आपत्कालीन परिस्थितीतच या सेवेचा वापर करावा, असे स्पष्ट आवाहन केले आहे.

## तेल्हाऱ्यात २० जुलै रोजी 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा !!

### नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना सुवर्णसंधी

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी:** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित युवक-युवतींना रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी अकोल्यात 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा सोमवार, २० जुलै २०२६ रोजी डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, तेल्हारा, अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (अकोला), मॉडेल करिअर सेंटर (अकोला) आणि डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय (तेल्हारा) यांच्या संयुक्त विद्यमाने घेतला जात आहे.

मेळाव्या साठी विविध क्षेत्रातील नामांकित वैभव बायोटेक, सहयोग मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी, स्पेक्ट्रम इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज, एल. अँड टी. फायनान्स, वन एशिया नेटवर्क इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक यांसारख्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील.

मेळाव्यात कंपन्यांचे प्रतिनिधी उमेदवारांची प्रत्यक्ष




मुलाखत घेऊन पात्र उमेदवारांना जागेवरच नोकरीची संधी देणार आहेत.

ऑनलाईन नोंदणी कशी करावी?

इच्छुक उमेदवारांनी मेळाव्यात सहभागी होण्यासाठी www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. नंतर लॉगिन करून 'Employment' टॅबवर क्लिक करून 'Job Seeker' पर्याय निवडा आणि आपल्या आयडी-पासवर्डने साईन इन करा. होम पेजवरील 'Job Fair' पर्याय निवडून 'अकोला' जिल्हा निवडा. त्यानंतर २० जुलैच्या मेळाव्यावर क्लिक करा. रिक्त पदांच्या पात्रतेनुसार 'Apply' बटणावर क्लिक करून आपली नोंदणी निश्चित करा. यशस्वी नोंदणीनंतर मिळणाऱ्या रजिस्ट्रेशन स्लिपची प्रिंट काढा.

मेळावा डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा), जि. अकोला येथे होत असून उमेदवारांनी मेळाव्याच्या दिवशी स्वतःचा बायोडाटा, पासपोर्ट आकाराचे फोटो आणि आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे सोबत घेऊन प्रत्यक्ष उपस्थित राहावे. कोणत्याही अडचणीसाठी जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाच्या (०७२४) - २४३३८४९ या क्रमांकावर किंवा akolarojgar@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधता येईल.अकोला जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त श्री. प्रफुल्ल सु. शेळके यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींना या रोजगार मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगावला धडक निवेदन

### मालेगाव–आमखेडा रस्ता दुरुस्त न झाल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव–कोल्ही–बोरगाव–पिंपळा–आमखेडा या अत्यंत महत्त्वाच्या ग्रामीण मार्गाची झालेली दयनीय अवस्था, नागरिकांचे हाल आणि वाढता अपघाताचा धोका लक्षात घेऊन निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगाव येथे रस्ता दुरुस्ती, रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगाव येथील नागेश पांडे (सी.ई.) व खराटे सर यांना निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे वाशिम जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी मालेगाव तालुकाध्यक्ष प्रकाश भुरे, रिसोड तालुकाध्यक्ष गोपाल बोरकर पाटील तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून मालेगाव–कोल्ही–बोरगाव–पिंपळा–आमखेडा या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून रस्त्यावर सर्वत्र मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि खडीकरण झाल्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्याचे अस्तित्वच संपुष्टात आल्याचे चित्र असून अक्षरशः खडीकरण झालेल्या या मार्गावरून दुचाकी, चारचाकी वाहने तर दूरच, साधे पायी चालणेही धोकादायक बनले आहे. पावसाळ्यामुळे खड्ड्यांमध्ये



पाणी साचत असल्याने अपघातांचा धोका अधिकच वाढला असून एखादी मोठी जीवितहानी होण्यापूर्वीच प्रशासनाने तातडीने या रस्त्याची दखल घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

या रस्त्याचा वापर दररोज शेकडो नागरिक करतात. दूध उत्पादक शेतकरी सकाळी दूध संकलनासाठी याच मार्गाने ये-जा करतात. तसेच शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवती, वृद्ध नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विविध कामानिमित्त प्रवास करणारे नागरिक या रस्त्यावर पूर्णपणे अवलंबून आहेत. विशेष म्हणजे श्री पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळा येथे शिक्षणासाठी परिसरातील अनेक गावांतील विद्यार्थी याच मार्गाने येतात. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याने परिसरात तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे.

या गंभीर प्रश्नावर यापूर्वी विविध दैनिकांमधून अनेक वेळा बातम्या प्रकाशित झाल्या. संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत हा विषय पोहोचविण्यात आला. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही

**जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर; नागेश पांडे (सी.ई.) व खराटे सर यांच्याकडे तातडीने कार्यवाहीची मागणी**

**प्रमुख मागण्या**

१)मालेगाव–कोल्ही–बोरगाव–पिंपळा–आमखेडा रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी.
२)रस्त्याचे पूर्ण रुंदीकरण करून दर्जेदार डांबरीकरण करण्यात यावे.
३)पावसाळ्यातील अपघात टाळण्यासाठी तातडीची उपाययोजना करावी.
४)विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांच्या सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी.
५)अन्यथा राज्यव्यापी लोकशाही आंदोलन छेडण्यात येईल.

प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने या मार्गाकडे सातत्याने कानाडोळा केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्याचा मोठा फटका बसत आहे.

निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाने निवेदनाद्वारे स्पष्ट इशारा दिला आहे की, या मागणीची तात्काळ दखल घेऊन रस्ता दुरुस्ती, रुंदीकरण व डांबरीकरणाच्या कामाला त्वरित सुरुवात न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाची राहील, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

संघटनेचे जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांनी सांगितले की, नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असून हा रस्ता अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. एखादा निष्पाप नागरिक अपघातात बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. नागरिकांच्या जीवाशी खेळणारी ही निष्क्रियता आता खपवून घेतली जाणार नाही. वेळीच कार्यवाही झाली नाही तर वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठे लोकशाही आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी संघटनेने स्पष्ट केले की, निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ ही देशव्यापी संघटना असून, स्थानिक प्रशासनाने मागणीकडे दुर्लक्ष केल्यास राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय गणेशजी कचकलवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात साखळी आंदोलन उभारण्यात येईल. आवश्यक असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच राज्य शासनाविरोधात व्यापक जनआंदोलन छेडण्यात येईल. सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, यापुढे कोणत्याही प्रकारची दिरंगाई सहन केली जाणार नाही, असा ठाम निर्धार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# एरंडोल : मतदान यादीच्या SIR कामासाठी मारवाडी गल्लीत उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**एरंडोल (प्रतिनिधी)** : मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावलोकन (SIR) कार्यासाठी मारवाडी गल्ली, दगडू पंडित शेठ देवरे परिसरात आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त आणि उत्साही प्रतिसाद मिळाला.



नगरसेविका सौ.पौर्णिमा देवरे यांच्या विशेष सहकार्याने हा कॅम्प आयोजित करण्यात आला होता. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होऊन आपल्या नावाची नोंदणी, मतदार यांची माहिती आदी कामे पूर्ण केली. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी सकाळपासून कॅम्पमध्ये गर्दी केली होती.

नगरसेविका सौ.पौर्णिमा देवरे यांनी स्वतः कॅम्पला भेट देऊन नागरिकांना मार्गदर्शन केले.

"प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीत आपले नाव शोधणे व बीएलओ कडून तपासणे अत्यंत आवश्यक आहे.लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान हक्काचा वापर करणे हे आपले कर्तव्य आहे.

या कॅम्पच्या माध्यमातून आम्ही शेवटच्या व्यक्तीपर्यंत सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत."

स्थानिक नागरिकांनी नगरसेविका सौ. पौर्णिमा देवरे यांच्या सातत्याने चालणाऱ्या सामाजिक कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. "देवरे कुटुंब नेहमीच परिसराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या समस्यांसाठी पुढे असते," असे अनेकांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत तांत्रिक शिक्षणाची कास धरावी' ; प्राचार्य सुविद्य गावंड

## उरण येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयात ११वीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा उत्साहात संपन्न !

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** आधुनिक युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचे युग असून विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत तांत्रिक शिक्षणाची कास धरणे ही काळाची गरज आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा प्रभावी वापर करण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य सुविद्य गावंड यांनी केले. उरण येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयात आयोजित अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



ते पुढे म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही शाखेतील शिक्षण घेत असताना आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा अभ्यास करून त्यांचा सकारात्मक वापर करण्यासाठी विशेष मेहनत घ्यावी. यामुळे भविष्यातील स्पर्धात्मक जगात यश मिळविणे अधिक सुलभ होईल.

यावेळी रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावीनंतरचा अकरावीचा टप्पा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. भविष्यातील यशस्वी वाटचालीचा हा श्रीगणेशा असून विद्यार्थ्यांनी नवीन दिशा, नवीन संधी आणि नवीन ध्येय स्वीकारताना शिस्त, सातत्य आणि परिश्रम यांना प्राधान्य द्यावे. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर शिस्त हीच यशाची गुरुकिल्ली ठरते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या प्रतिमेचे पूजन, सरस्वती पूजन, इशस्तवन आणि स्वागत गीताने झाले या कार्यक्रमाला शिक्षक मित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे महाविद्यालयाचे प्राचार्य सुविद्य गावंड, रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शरद केणी, पत्रकार संग्राम ठाकूर तसेच पालक प्रतिनिधी सुवर्णा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन रोहिणी गोरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन निवास गावंड यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीने विशेष परिश्रम घेतले. ११ वी मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# उप सभापती श्री भाई ( रघुनाथ ) शिंदे यांच्या पाठपुराव्या मुळे करबेळी ठाकूरवाडी झाली येथे प्रकाशमय

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :** खालापूर तालुक्यातील अतिदुर्गम अशा उंच डोंगरावर करंबेळी ठाकूरवाडी वसलेली आहे. किमान ६० ते ७० घराची लोकवस्ती असलेला आदिवासी ठाकूर समाजाचा पाडा आहे. मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे तेथील वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. संपूर्ण गाव गेली १५ दिवस अंधातर होता. वीज नसल्यामुळे शाळेत जाणाऱ्या मुलांना अंधारात अभ्यास करता येत नव्हता. गावातील ग्रामस्थ व महिला वीज नसल्यामुळे त्रस्त झाले होते. या विषयी गावातील युवक श्री गणेश माडे, श्री रमेश माडे ,श्री यशवंत माडे वारंवार पाठ पुरावा करत होते, परंतु त्याच्या प्रयत्नांना यश येत नव्हता. या गोष्टीची खबर कार्यतत्पर उप सभापती श्री भाई (रघुनाथ ) शिंदे यांच्या पर्यंत गेल्यानंतर त्यानी लगेच विद्युत महामंडळ अभियंता वावोशी यांच्याशी



संपर्क साधून पनवेल येथून नवीन डीपी मागून घेतली.

मुसळधार पावसामुळे ठाकूरवाडी येथे जाणारा रस्ता पूर्णपणे वाहून गेला होता.अशा परिस्थितीत विद्युत महामंडळ यांची गाडी ठाकूरवाडी येथे जाऊ शकत नव्हती यांची पूर्ण कल्पना आल्यानंतर



उप सभापती श्री भाई (रघुनाथ ) शिंदे यांनी स्वतच्या JCB व इतर वाहनाच्या साह्याने नवीन डीपी करंबेळी ठाकूरवाडी येथे घेऊन जाऊन गेली १५ दिवसापासून खंडित असलेला वीज पुरवठा सुरळीत करून आदिवासी वाडीत प्रकाश निर्माण केला व आपल्या या कार्यामुळे गरीब आदिवासी समाजाविषयी असणारी तळमळ दिसून आली.

# शिळफाटा उड्डाणपुलाला 'श्री खरवली देवी उड्डाणपूल' नाव द्या

## भाजपा नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत कल्याण ग्रामीण प्रतिनिधी** : ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २९ मधील शिळफाटा परिसरातील ऐतिहासिक व हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री खरवली देवी मंदिराच्या सन्मानार्थ शिळफाटा येथील उड्डाणपुलाला श्री खरवली देवी उड्डाणपूल असे नाव देण्याची अधिकृत मागणी नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी केली आहे.

शिळफाटा परिसरातील श्री खरवली देवी मंदिर हे अनेक वर्षांपासून ठाणे, कल्याण, डोंबिवली, दिवा तसेच आसपासच्या परिसरातील नागरिकांचे श्रद्धास्थान आहे. स्थानिक नागरिकांच्या धार्मिक भावना, परिसराची ऐतिहासिक ओळख आणि सांस्कृतिक वारसा जपण्याच्या उद्देशाने उड्डाणपुलाला श्री खरवली देवी उड्डाणपूल असे नाव देण्यात यावे, अशी



मागणी त्यांनी अधिकृत प्रस्तावाद्वारे केली आहे.

या संदर्भातील प्रस्ताव ठाणे महानगरपालिका आयुक्त मा. श्री. सौरभ राव, महापौर मा. सौ. शर्मिला पिंपळोळकर, उपमहापौर मा. श्री. कृष्णा दादू पाटील, महानगरपालिका सचिव मा. श्री. मनीष जोशी, सभागृह नेते मा. श्री. हनुमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते मा. श्री. शानू पठाण तसेच भाजप गटनेते मा. श्री. मुकेश मोकाशी यांना सादर करण्यात आला असून, या प्रस्तावाला सर्वपक्षीय पाठिंबा देऊन आगामी महासभेत मंजुरी द्यावी, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

याबाबत नगरसेविका वेदिका साहिल पाटील म्हणाल्या, श्री खरवली देवी हे शिळफाटा परिसरातील नागरिकांचे आराध्य दैवत असून या मंदिराला ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. या उड्डाणपुलाला देवीचे नाव दिल्यास परिसराची ओळख अधिक दृढ होईल आणि हजारो भाविकांच्या भावना जपल्या जातील. हा केवळ नामकरणाचा प्रस्ताव नसून आपल्या सांस्कृतिक परंपरेचा सन्मान करण्याचा प्रयत्न आहे.

स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले असून, ठाणे महानगरपालिकेने सर्वपक्षीय सहमतीने हा प्रस्ताव मंजूर करून शिळफाटा उड्डाणपुलाला श्री खरवली देवी उड्डाणपूल हे नाव अधिकृतपणे द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# पावसाने दडी मारल्याने शेतकरी हवालदिल; खरीप पिके धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने** : जुलै महिन्याचा मध्य उलटूनही जाफराबाद तालुक्यात समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके करपू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता पसरली आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठी अनेक शेतकऱ्यांनी सावकारांकडून व इतरांकडून व्याजाने पैसे उचलले, तर काहींनी घरातील महिलांचे सोन्याचे दागिने गहाण ठेवून बियाणे, खते, औषधे आणि मशागतीसाठी भांडवल उभे केले. मात्र पावसाने दडी मारल्याने ही संपूर्ण गुंतवणूक धोक्यात आली असून कर्जाचा डोंगर वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी पेरणी पूर्ण केली असली तरी पुरेशा पावसाअभावी पिकांची उगवण समाधानकारक झालेली नाही. काही ठिकाणी दुबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता असून त्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागणार आहे.

त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे.दरम्यान, शेतकऱ्यांनी शासनाने तातडीने शेतपिकांचे पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत जाहीर करावी, पीकविमा दावे त्वरित निकाली काढावेत आणि आवश्यक त्या दिलासादायक उपाययोजना कराव्यात, अशी कुजबुज चालू आहे. येत्या काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास खरीप हंगामावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# पाण्यासाठीची प्रतीक्षा संपली ! जगताप मॅडम यांच्या तत्पर आदेशाने विष्णूनगरचा बंद हातपंप अखेर सुरू

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** :-विष्णूनगर येथील अनेक दिवसांपासून बंद पडलेल्या हातपंपामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पाण्याअभावी महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची मोठी गैरसोय होत होती.

या समस्येची माहिती गटविकास अधिकारी जगताप मॅडम यांना देण्यात आली. त्यांनी कोणताही विलंब न करता तात्काळ ग्रामविकास अधिकारी विजय गरुड यांना आवश्यक सूचना दिल्या. त्यांच्या



'पाणी म्हणजे जीवन. आमच्या अडचणीची तात्काळ दखल घेऊन बंद हातपंप सुरू करून दिल्याबद्दल मा. गटविकास अधिकारी जगताप मॅडम आणि ग्रामविकास अधिकारी विजय गरुड यांचे विष्णूनगर ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक आभार. आपल्या तत्परतेमुळे गावाला मोठा दिलासा मिळाला आहे.'

प्रतिक्रिया :-प्रकाश खरे

मार्गदर्शनानुसार संबंधित कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन हातपंपाची दुरुस्ती व आवश्यक फिटिंगचे काम पूर्ण केले.

दुरुस्तीचे काम पूर्ण होताच अनेक दिवसांपासून बंद असलेला हातपंप पुन्हा सुरू झाला आणि स्वच्छ पाण्याच्या धारा वाहू लागल्या. त्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता मार्गी लागला आहे.

ग्रामस्थांच्या मूलभूत गरजेची तात्काळ दखल घेत प्रभावी निर्णय घेणाऱ्या गटविकास अधिकारी जगताप मॅडम तसेच त्यांच्या सूचनांची तत्पर अंमलबजावणी करणारे ग्रामविकास अधिकारी विजय गरुड यांचे विष्णूनगर ग्रामस्थांकडून मनापासून कौतुक होत आहे.

## बीएलओ गजानन कराळे व स्वप्ना कराळे यांची उल्लेखनीय कामगिरी !!

# मतदार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे अकोला प्रतिनिधी** : मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात 31-अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील बीएलओ

दांपत्याने फॉर्म वितरण, संकलन व डिजिटायझेशनचे काम अवघ्या अठरा दिवसात पूर्ण केले.

यादी भाग क्रमांक 28 चे बीएलओ गजानन पांडुरंग कराळे (एकूण मतदार – 665) तसेच यादी भाग क्रमांक 30 च्या बीएलओ सौ.स्वप्ना गजानन कराळे (एकूण मतदार – 521) यांनी अत्यंत उत्कृष्ट कार्य करून अवघ्या 18 दिवसांत शंभर टक्के फॉर्म वितरण, फॉर्म संकलन आणि डिजिटायझेशनचे काम पूर्ण केले




आहे.विशेष बाब म्हणजे हे दोघेही पती-पत्नी असून शिक्षक म्हणून नियमित शालेय जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. त्यांनी निवडणूक आयोगाने सोपविलेली जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे, वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण केली आहे. त्यांच्या कार्यातून कर्तव्यनिष्ठा, उत्कृष्ट नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि लोकसेवेप्रती असलेली बांधिलकी दिसून येते. त्यांच्या या कार्यामुळे इतर बीएलओंसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व बीएलओ, पर्यवेक्षक, केंद्रस्तरीय अधिकारी व कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. त्यामध्य कराळे व सौ. स्वप्ना कराळे यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली आहे.जिल्हा प्रशासनाकडून दोहोंचेही अभिनंदन करण्यात आले. मतदार नोंदणी अधिकारी डॉ. शरद जावळे यांच्या हस्ते दोघांचा गौरव करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# मालेगाव तालुक्यात कोळपणीच्या कामांना गती

**दैनिक युवक आधार**

**मालेगाव तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे** : मालेगाव जून महिन्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे मालेगाव तालुक्यातील खरीप पिकांची वाढ जोमाने होत असून आता शेतकऱ्यांनी कोळपणीच्या कामांना वेग दिला आहे सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांमध्ये तणांचा प्रादुर्भाव वाढू नये तसेच पिकांच्या वाढीस पोषक वातावरण मिळावे यासाठी शेतकरी शेतात राबताना दिसत आहेत यंदा वेळेवर झालेल्या पावसामुळे पिकांची उगवण चांगली झाली आहे त्यामुळे तणनियंत्रणासाठी डवरणी व कोळपणी ही अत्यंत महत्त्वाची मशागत शेतकरी प्राधान्याने करत आहेत अनेक ठिकाणी बैलांच्या सहाय्याने पारंपरिक पद्धतीने डवरणी केली जात असून काही शेतकरी आधुनिक अवजारांचाही वापर करत आहेत डवरणी व कोळपणीमुळे पिकांच्या मुळांना हवा मिळते तणांचे नियंत्रण होते आणि रासायनिक तणनाशकांच्या फवारणीवरील खर्चातही बचत होत असल्याने शेतकरी या पद्धतीला अधिक पसंती देत आहेत. त्यामुळे पिकांच्या वाढीस चालना मिळून उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे बहुतांश शिवारात डवरणी व कोळपणीची कामे युद्धपातळीवर सुरू असून शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त आहेत अनुकूल हवामान कायम राहिल्यास यंदा खरीप हंगामात चांगले उत्पादन मिळेल, असा आशावाद शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे